रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १६१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, २८ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कळंबोलीत पोटच्या मुलीचा आईने केला खून/३
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
जनतेची सेवा हा भाजपचा व्यवसाय -पंडित पाटील/७

## मुंबईसाठी भाजप महायुतीचा जागांसाठीचा फॉर्म्युला ठरला



**मुंबई :** मुंबई महापालिकेसाठी भाजप आणि शिवसेना शिंदे यांच्यातील महायुतीचे जागा वाटप अंतिम टप्प्यात असून २०७ जागांवर एकमत झाले आहे. २० जागांवरील चर्चा सुरू असून लवकरच पहिली यादी जाहीर होणार आहे. भाजप-शिवसेनेची एकत्रित बैठक झाली, जनसभा नियोजन आणि संयुक्त सभा, जागावाटपाची ही चर्चा झाली. भाजप १२८ जागा, शिवसेना ७९ जागा अशा २०७ जागांवर एकमत झालेला आहे. समोर उमेदवार कोण आहे याचा विचार करून उर्वरित जागांवर भाजप लढणार की शिवसेना लढणार याचा निर्णय घेऊ, अशी माहिती मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी दिली. महायुतीच्या नेत्यांची रंगशारदा येथील बैठक संपून शिवसेना आणि भाजपचे नेते उरलेल्या २० जागांच्या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन बंगल्यावर पुढील चर्चेसाठी निघाले होते.



# रोडपालीत शेकापला जोरदार झटका

## ■ प्रमुख कार्यकर्त्यांचा समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोडपालीत शेतकरी कामगार पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. शेकापचे अनेक प्रमुख कार्यकर्ते व त्यांच्या समर्थकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते प्रवेशकर्त्यांचे स्वागत करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देशात व राज्यात आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. त्या विकास प्रवाहात सहभागी होण्यासाठी अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये येत आहेत. त्यानुसार रोडपालीतील कार्यकर्ते भाजपमध्ये सहभागी झाले. शेकापक्षातून दत्ता पगडे, अमर कान्हा भगत, प्रशांत सुरेश पाटील, रोशन नारायण भोईर, सूरज जनार्दन पाटील, अरविंद गोकुळ भोईर, प्रणय गोकुळ भोईर, राजेश नारायण भोईर, प्रविण म्हात्रे, आयुष हरिचंद्र पाटील, अमित कान्हा भगत, हेमंत धनंजय म्हात्रे, सचिन जनार्दन पाटील, अक्षय कान्हा भगत, मितेश गुरुनाथ पाटील, चेतन अशोक ठाकूर, हृतिक रोहिदास भोईर यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

या वेळी भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक संतोष शर्मा, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, ज्येष्ठ नेते अरुण पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## कोल्हापूरमध्ये आघाडीत वाद

**कोल्हापूर :** महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये जागावाटपावरून एकमत झालेय, पण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जागा वाटपावरून बिनसले.

दरम्यान, जागावाटपावरून शरद पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते तथा काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांना २५ तारखेला अल्टिमेटम दिला होता. जर सन्मानजनक तोडगा काढणार नसाल, तर आम्ही तिसरी आघाडी करण्यासाठी सक्षम आहोत, असा इशारा राष्ट्रवादीने दिलाय. आमच्या पक्षाला दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे. आम्ही इंडिया आघाडीसह सतेज पाटील यांना अल्टीमेटम देत आहोत.

## खारपाडा दुष्मी परिसरात रेल्वेच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

सध्या बिबट्या मानवी वसाहतीत येत असल्याने बिबट्याची दहशत पसरली असतानाच पाणी पिण्यासाठी आलेल्या बिबट्याला रेल्वेची जोरदार धडक लागल्याने बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना पेण तालुक्यात घडली आहे.

पेण तालुक्यातील खारपाडा दुश्मि परिसरातील खारपाडा सावरोली रस्त्या नजिक असलेल्या रेल्वे रुळा जवळ शनिवारी (दि.२७) सकाळी मृत अवस्थेत बिबट्या मेलेला सापडला आहे. खारपाडा दुष्मी हा परिसर जंगल भाग असून बाजूला खाडी आहे. जंगल भागातील वन्य जीव पाण्याच्या शोधात खाडी कडे जातात शनिवारी असाच एक बिबट्या रेल्वे मार्गाने जात असताना त्याला



रेल्वेची जोरदार धडक बसल्याने त्याचा मृत्यू झाला असावा, असे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले आहे.

या वेळी परिसरातील नागरिकांनी पोलीस प्रशासन आणि वन विभागाला संपर्क करून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच वन अधिकारी घटनास्थळी पोहचले व पंचनामा केला.

## पुण्यात आप स्वबळावर

### महाविकास आघाडीत फूट

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात जागा वाटपाचा फॉर्म्युला जाहीर होताच तासाभरात महाविकास आघाडी फूटली आहे. आम आदमी पक्षाने (आप) महाविकास आघाडीसोबत निवडणूक न लढवता स्वतंत्रपणे लढणार असल्याची घोषणा केली आहे. पक्ष पुण्यात १०० हून अधिक उमेदवार रिंगणात उतरवणार आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी शनिवारी पुण्यातील जागा वाटपावर शिक्कामोर्तब केले. काँग्रेस, शिवसेना (उबाठा गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रत्येकी ५० जागा लढविणार असल्याचे घोषित करण्यात आले. तर आप, वंचित व रासप यांना प्रत्येकी १२-१५ जागा सोडण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते अंकुश काकडे यांनी दिली.

'आप'चे प्रदेश प्रवक्ते मुकुंद किर्दत म्हणाले, महाविकास आघाडीबरोबर मागील निवडणुकीत आपचा सहभाग फायद्याचा ठरला नाही. घराणेशाही, भ्रष्टाचार आणि गुंडगिरीसंदर्भात स्पष्ट भूमिका नसल्यामुळे आता आपण स्वतंत्रपणे मैदानात उतरतो.

## पुण्यात काँग्रेसला धक्का; माजी मंत्र्यांचा मुलगा भाजपत



**पुणे :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. अशातच पुण्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर यांचा मुलगा आणि माजी नगरसेवक अभिजित शिवरकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. काँग्रेसमधे दाखल झालेल्या प्रशांत जगताप यांच्याविरोधात वानवडी भागातील प्रभागातून अभिजित शिवरकरांना भाजपकडून उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

भाजपमध्ये पक्ष प्रवेश केल्यानंतर अभिजित शिवरकर यांनी अनेकजण माझे सहकारी आज भाजपमध्ये पक्ष प्रवेश करत आहेत. भाजपमध्येदेखील एकनिष्ठ राहणार असून पुणे शहराच्या विकासासाठी भाजप सोबत गेल्याची माहिती दिली.

## जागावाटपावरून 'मविआ' बैठकीत राडा

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शनिवारी (दि.२७) महाविकास आघाडीची बैठक झाली. बैठकीनंतर नेत्यांनी पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीचा फॉर्म्युला जाहीर केला. काँग्रेस ४५, शिवसेना उद्धव ठाकरे ३०, राष्ट्रवादी अजित पवार पक्ष २०, माकप ७ असे ठरले आहे. बैठकीदरम्यान शिवसेनेचे नेते आणि मनसे नेते एकमेकांच्या अंगावर धावून गेले आहेत.

जुन्या शिवसैनिकाने महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेनंतर भर सभेत जोरजोरात ओरडत शिवसेनेकडून तिकीट मिळाले नाही तर माझ्या प्रभागातील काँग्रेस पक्षाला उद्धवस्त करणार असा इशारा दिला आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीदरम्यान शिवसेनेचे नेते एकमेकांना अरेरावीची भाषा करताना आढळून आले. प्रभाग ८ मध्ये ओपन पुरुष जागा ही शिवसेनेने घेतली आहे. एक जागा ओबीसीसाठी राखीव आहे. मनसे नेते विनायक महिंद्र यांनी ओबीसी जागेसाठी मागणी केली. उबाठा नेते अजय दासरि यांनी दोन्ही जागांवर दावा केल्याने मनसे नेते चिडले. एक जागा आम्हाला ओबीसी सोडा असे मनसेची मागणी होती.

या कारणावरून मनसे नेते विनायक महिंद्र आणि शिवसेना नेते अजय दासरी यांच्यात अरेरावीची भाषा झाली. दोन्ही नेते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. यामुळे महाविकास आघाडीच्या बैठकीत गोंधळ सदृश परिस्थिती निर्माण झाली होती.

## निवडक

### विहिरीतील मोटार काढताना विजेचा धक्का; चौघांचा मृत्यू

**धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे विजेच्या धक्क्याने चौघांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. मृतांमध्ये वडील, मुलगा आणि दोन मजुरांचा समावेश आहे. गावातील गणपत साखरे यांच्या शेतात विहिरीतील मोटार काढण्याचे काम सुरू होते. क्रेनच्या सहाय्याने ही मोटार बाहेर काढली जात असताना क्रेनचा वरील भाग महावितरणच्या विद्युत हायव्होल्टेज तारेला स्पर्श झाल्याने क्रेनमध्ये करंट उतरल्याची धक्कादायक घटना घडली. त्यात, मोटार काढण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या चौघांचाही जागेवरच मृत्यू झाला.

### एमपीएससीतर्फे नवी जाहिरात; उमेदवारांसाठी मोठी संधी

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित, गट-अ आणि गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यभरातील ३८ जिल्हा केंद्रांवर ३१ मे रोजी परीक्षा घेतली जाणार असून, या परीक्षेसाठी उमेदवारांना ३१ डिसेंबर ते २० जानेवारी या कालावधीत अर्ज करता येणार आहे.



## उपमुख्यमंत्री शिंदेंनी घेतली काळोखे कुटुंबियांची भेट

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती शिवसैनिक मंगेश काळोखे यांची शुक्रवारी हत्या करण्यात आली या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खोपोलीतील साईबाबा नगर येथील काळोखे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

शिवसेना व मी स्वतः आपल्या दुःखात सहभागी असल्याचे त्यांनी या वेळी कुटुंबियांना शब्द दिला, याचवेळी त्यांनी काळोखे यांच्या घराबाहेर जमलेल्या समर्थक नातेवाईक व शिवसैनिकांना संबोधित करताना या हत्या प्रकरणातील जे जे आरोपी असतील त्यांना त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल मग तो कोणीही असो, आपण सर्वांनी काळोखे यांच्या कुटुंबियांच्या मागे ठाम उभे राहिले पाहिजे त्यांना एकाकी पडून देऊ नका शिवसेना ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असे या वेळी त्यांनी सांगितले.

उशिरा रात्री मंगेश काळोखे यांच्यावर अमरधाम स्मशानभूमी त हजारोंच्या उपस्थितीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याचवेळी मंत्री भरत गोगावले व आमदार महेंद्र शेठ थोरवे त्याचप्रमाणे शिवसेना नेते व समर्थ कार्यकर्त्यांनी काळोखे यांचे अंत्यदर्शन घेतले.

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रस्ते काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत मंजूर झालेल्या ओएनजीसी सिग्नल ते शिवकर-मोहो-पाली रस्ता काँक्रीटीकरणाचा शुभारंभ शनिवारी उत्साहात झाला.

भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते ओएनजीसी. सिग्नल जवळ या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. या विकासकामासाठी एकूण ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे परिसरातील दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर आणि अरुणशेठ भगत यांच्या विशेष प्रयतकातून हा निधी उपलब्ध झाला आहे. शिवकर, मोहो



आणि पाली परिसरातील नागरिकांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून, रस्ता खराब असल्यामुळे होणारी गैरसोय आता दूर होणार आहे.

या महत्वपूर्ण विकासकामाबद्दल स्थानिक नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे विशेष आभार मानले आहेत. या भूमीपूजन सोहळ्याला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, उसर्लीचे सरपंच नितीन भगत, उपसरपंच रवींद्र ढवळे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, सुनील गवंडी, मच्छिंद्र पाटील, जयवंत भगत, संजय भगत, मुकेश भगत, प्रमोद पाटील, प्रवीण म्हात्रे, मंगेश ढवळे, समीर पोपेटा, अरविंद माळी यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यात यंदा आंब्याच्या उत्पादनात २० टक्के वाढ अपेक्षित

**अलिबाग : प्रतिनिधी**

थंडीमुळे आंबा कलमांना मोहोर येण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. रायगड जिल्ह्यातील बागांमध्ये आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहोर येऊ लागला आहे. आंब्यासाठी पोषक वातावरण आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील यंदा आंबा उत्पादनात १० ते २० टक्के वाढ होण्याची शक्यता बागायतदार वर्तवीत आहेत.

रायगड जिल्ह्यात आंबा लागवडीखालील एकूण ४२ हजार हेक्टर क्षेत्र आहे. यापकी १४ हजार ५०० हेक्टर उत्पादनक्षम क्षेत्र आहे. यातून दरवर्षी जवळपास २१ हजार ४२४ मेट्रीक टन एवढे उत्पादन



अपेक्षित असते. यंदा मात्र या उत्पादनात १० ते २० टक्के वाढ अपेक्षित आहे. आंबा उत्पादनासाठी पोषक वातावरण कायम राहिल्याने, तसेच किडरोगाचा फारसा प्रादुर्भाव नसल्याने आंबा उत्पादनात काही प्रमाणात वाढ अपेक्षित असल्याचे सांगितले जात आहे.

दरवर्षी आंब्याला ऑक्टोबर महिन्यात पालवी येण्याची प्रक्रिया सुरू होत असते. या पालवीला डिसेंबर, जानेवारी महिन्यात मोहर येतो. यंदा मोहर येण्याची प्रक्रिया वेळेत सुरू झाली आहे. एकूण उत्पादनक्षम क्षेत्रापैकी जवळपास ७० टक्के क्षेत्रावर मोहर आला आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत फळधारणेचे प्रमाण समाधानकारक राहणार आहे.

लवकर मोहोर आलेला कोकणातील मार्च महिन्यात वाशीच्या मार्केटमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. तसेच एप्रिल महिन्यापासून कोकणातील आंबा मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल होण्यास सुरुवात होईल. जून महिन्यापर्यंत मुबलक प्रमाणात आंबा बाजारात असेल, असा अंदाज बागायतदार वर्तवित आहेत.

## श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्यांकरिता बंद

**पुणे : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भीमाशंकर संस्थानने घेतला आहे, भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूड्डी यांनी केले आहे.



राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखडा मंजुर केला आहे. मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदिर दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

## पश्चिम रेल्वेवरील ३०० फेऱ्या रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांचे दैनंदिन आयुष्य लोकलच्या वेळापत्रकावर अवलंबून असते, मात्र येत्या शनिवार-रविवारच्या ब्लॉकमुळे मुंबईकरांसह पर्यटकांची मोठी गैरसोय होणार आहे. पश्चिम रेल्वेवरील सहाव्या मार्गिकेच्या कामासाठी शनिवारी (दि. २७) रोजी तब्बल ३०० लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या, तर मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात रविवारी (दि. २८) रोजी मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेवरील वांद्रे टर्मिनस ते बोरिवलीदरम्यान सहाव्या मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

कांदिवली-बोरिवलीदरम्यान पायाभूत कामे सुरू असून यासाठी २० डिसेंबरपासून पुढील ३० दिवसांचा वाहतूक ब्लॉक घेण्यात आला आहे. हा ब्लॉक १८ जानेवारी २०२६ पर्यंत असणार आहे. या कालावधीत शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी रात्री ११ वाजल्यापासून शनिवारी सकाळी ७ वाजेपर्यंत अप व डाऊन मार्गिका बंद राहणार आहेत.



या ब्लॉकदरम्यान कांदिवली ते दहिसरदरम्यान डाऊन जलद मार्गावर वेगमर्यादा लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे शनिवारी पश्चिम रेल्वेवरील अप, डाऊन, जलद व धीम्या अशा सुमारे ३०० लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहेत. बोरिवलीपर्यंत धावणाऱ्या १४ लोकल फेऱ्या गोरेगावपर्यंतच चालवण्यात येतील. तसेच अंधेरीहून सुटणाऱ्या काही लोकल सेवा फक्त गोरेगावपर्यंतच धावणार असल्याची माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनाने दिली आहे. पश्चिम रेल्वेवर दररोज सुमारे १,४०६ लोकल फेऱ्या चालतात. त्यापैकी ब्लॉक काळात सुमारे २० टक्के फेऱ्या रद्द होणार असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. नववर्षानिमित्त बाहेरगावी जाणारे प्रवासी आणि मुंबईत पर्यटनासाठी येणाऱ्यांनाही या ब्लॉकचा फटका बसणार आहे.

# सिडकोच्या गृहनिर्माण प्रकल्पांना मानक कार्यप्रणाली अंमलबजावणीची नोटीस

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हवेची गुणवत्ता चांगली रहावी याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत असून त्यामधील एक महत्वाची बाब म्हणजे महापालिका क्षेत्रात सुरु असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे.




याकरिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टींगकरीता अवलंबवायची मानक कार्यप्रणाली जाहीर करण्यात आली असून बांधकाम प्रकल्पांच्या साईटवर होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाबाबतच्या दंडात्मक कारवाईबाबत दि.०१ ऑगस्ट २०२४ रोजी परिपत्रक पारीत करण्यात आले आहे. तसेच, उपरोक्त ध्वनी व वायू प्रदुषणाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत मा. उच्च न्यायालयाने दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी आदेश पारीत केलेले आहेत.

त्यानुसार आयुक्तांनी नमुंमपा क्षेत्रातील विकासक व वास्तुविशारद यांची विशेष बैठक घेऊन त्यांनी मानक कार्यप्रणालीचे काटेकोर पालन करावे असे सूचित केले होते. तथापि तुर्भे विभागाचा पाहणी दौरा करीत असतांना जुईनगर रेल्वे स्टेशनलगतचा भूखंड, सेक्टर ११, सानपाडा येथे सिडकोमार्फत सुरु.

असलेल्या सामुहिक गृहनिर्माण प्रकल्पाच्या साईटवर बांधकाम सुरु असतांना वायू व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी संदर्भिय मानक कार्यप्रणालीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशाच प्रकारे भूखंड क्र.१, सेक्टर १९, वाशी येथेही सिडकोमार्फत सुरु असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या बांधकाम ठिकाणीही मानक कार्यप्रणालीचे उल्लंघन होत असल्याचे निर्देशनास आले आहे.

त्यास अनुसरून सदर भूखंडांवर वायू व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी मानक कार्यप्रणालीनुसार योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात व केलेल्या उपाययोजनांचा अहवाल नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागास ७ दिवसांच्या आत सादर करावा, अशी नोटीस देण्यात आलेली आहे. त्यानुसार केलेल्या उपाययोजनांचा अहवाल सादर न केल्यास बांधकाम स्थगितीबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असेही नोटीसीमध्ये सूचित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने हवा गुणवत्ता राखण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणा-यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

## महाड निवडणूक हाणामारी प्रकरणी आणखी तीन आरोपी अटक

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिका निवडणुकीच्या दरम्यान शिवसेना व राष्ट्रवादी यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारी मध्ये महाड पोलिसांकडून गुन्हा दाखल झाला असला तरी काही आरोपी हे फरार होते. या प्रकरणी महाड पोलिसांच्यावतीने या आरोपींच्या शोधा करता दोन पोलीस पथके रवाना करण्यात आली होती त्यातील तीन आरोपींना पकडण्यात आज पोलिसांना यश आले आहे.




महाड नगरपालिका निवडणूक दरम्यान मतदानाच्या दिवशी दोन डिसेंबर रोजी मतदान केंद्र क्रमांक एक व दोन या ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे व शिवसेने शिंदे गटाचे कार्यकर्ते समोरासमोर आल्यानंतर यांच्यामध्ये प्रचंड प्रमाणात हाणामारी होऊन वाहनांची तोडफोड झाली होती. याप्रकरणी महाड शहर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली होती. मात्र या गुन्ह्यातील इतर आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले होते. सदर गुण्याचे गांभीर्य लक्षात घेऊन रायगड पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली महाड शहर पोलिसांच्या वतीने या आरोपींच्या शोधासाठी दोन पदके रवाना करण्यात आली होती. पहिल्या पथकाला यातील प्रतीक प्रताप शिंदे राहणार प्रभात कॉलनी महाड व प्रतीक नरेश पवार राहणार नागलवाडी महाड हे आरोपी मुंबई ते गोवा असा विमानाने प्रवास करीत असल्याची माहिती त्यांच्या फोन लोकेशन वरून मिळाली. या पथकाने विमानतळावरती जाऊन या दोन्ही आरोपींना अटक केली,अमित अशोक कदम राहणार नागलवाडी हा त्याच्या घरी आला असल्याची माहिती मिळताच त्याला देखील त्याच्या घरून अटक केली तिन्ही आरोपींना आज न्यायालयात हजर केले असता त्यांना २९ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## पडताळणीअंती नवी मुंबईत आढळले १३,३३६ दुबार मतदार

### कोणत्या एका ठिकाणी मतदान करणार भरुन घेतले हमीपत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका निवडणूकीसाठी दि. १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. यामध्ये आयोगामार्फत दिलेल्या ४५ हजार ५८८ संभाव्य दुबार मतदारांच्या यादीची बीएलओमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली असून त्यामध्ये १३ हजार ३३६ दुबार मतदार आढळून आले आहेत.

त्यांच्याकडून ते कोणत्या प्रभागातील मतदार यादीत समाविष्ट असलेल्या नावावर मतदान करणार याचे विकल्प स्वरुपातील हमीपत्र भरुन घेण्यात आले आहे.

महापालिका क्षेत्रात राज्य निवडणूक आयोग यांच्या वतीने प्राप्त दुबार मतदारांच्या यादीनुसार तपासणी करण्यासाठी प्रभागनिहाय बीएलओ यांची पथके स्थापन करण्यात आली होती.

दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार संगणक प्रणालीव्दारे दुबार मतदारांच्या नावानुसार व विधानसभा यादी भागाप्रमाणे मतदार यादीचे वर्गीकरण करण्यात आले व छायाचित्रे असलेली दुबार मतदारांची यादी बीएलओ यांच्याकडे पडताळणीसाठी देण्यात आली होती.

बीएलओ मार्फत मतदार यादीतील या संभाव्य दुबार नावांचा शोध घेऊन, फोटो पडताळणी करुन, ही नावे काणत्या प्रभागात आहेत, छायाचित्रात साम्य आहे काय, आई वडीलांच्या नावात साम्य आहे काय, पत्ता सारखा आहे काय – अशा विविध प्रकारे तपासणी करण्यात आली.

त्यामध्ये एकाच व्यक्तीचे नाव दोन पत्त्यांवर आढळल्यास अशी दुबार नाव असलेली व्यक्ती त्यापैकी कुठल्या पत्त्यावर असलेल्या नावांवर मतदान करेल याबाबत विकल्प अर्थात हमी पत्र भरुन घेण्यात आले आहे.

## नांदगाव हायस्कूलचे निवृत्त मुख्याध्यापक गिरीश जोशींचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**मुरुड : प्रतिनिधी**

नांदगावच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाचे निवृत्त मुख्याध्यापक तसेच एकेकाळचे शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस जयंतभाई पाटील व भाजपचे शिक्षक आमदार रामनाथ मोते सर यांचे विश्वासू सहकारी चिंतामणी तथा गिरीश जोशी यांनी नुकताच भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य महेंद्र चौलकर यांच्या नांदगाव येथील निवासस्थानी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसंदर्भात घेण्यात आलेल्या पक्षाच्या आढावा बैठकीत भाजपचे जिल्हा प्रमुख सतिश धारप ,ॲड.आस्वाद पाटील, ॲड. महेश मोहिते,वैकुंठ पाटील, चित्रा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गिरीश जोशी यांनी भाजपचे कमळ आपल्या हाती घेतले.या प्रसंगी तालुक्यातील भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गिरीश जोशी यांनी सांगितले कि, मुरुड तालुक्यातील राहिलेली विकासात्मक कामे व गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे.



## श्री अम्बिका योगाश्रमाचा २६वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**भिवंडी : रामप्रहर वृत**

तालुक्यातील लाखीवली गावात निसर्गरम्य परिसरात वसलेल्या अम्बिका योगाश्रमाच्या प्रकल्पात श्री अम्बिका योगाश्रमाचा २६ वा वर्धापन दिन गुरूवार दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अत्यंत भक्तीभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.




या वर्धापन दिन सोहळ्यासाठी महाराष्ट्रभर पसरलेल्या श्री अम्बिका योगाश्रमच्या विविध शाखांमधून ७०० ते ८०० योगसाधक व योगशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास संस्थेचे प्रमुख कार्यवाह श्री. विनायक देसाई गुरुजी, ज्येष्ठ योगशिक्षक श्री. व सौ. कर्पे, तसेच अम्बिका हेल्थकेअर प्रॉडक्शनचे प्रमुख श्री. पै यांची प्रमुख उपस्थिती लाभली.


कार्यक्रमाची सुरुवात सर्व योगसाधक व योगशिक्षकांनी एकत्र येऊन गायत्री मंत्राचे १०८ वेळा सामूहिक जप करून केली. त्यानंतर वातावरण शुद्ध व ऊर्जामय करणारा ओंकारनाद करण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण आश्रम परिसर अध्यात्मिक शांततेने व सकारात्मक उर्जेने भरून गेला.

या सोहळ्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'योगशिक्षक पदवीदान – २०२५' प्रदान समारंभ. अम्बिका योगाश्रममध्ये सलग २ वर्षांचे योगशिक्षण पूर्ण करून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नव्या योगशिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते योगशिक्षक पदवी प्रदान करण्यात आली. श्री विनायक देसाई गुरूजींनी उपस्थितांना संस्थेच्या एकूण कार्याबद्दलची माहिती व योग शिक्षणाविषयीचे अमूल्य असे मार्गदर्शन केले. कार्यक्रम स्थळी आनंद व अभिमानाचे वातावरण होते. कार्यक्रमाची सांगता शांतीपाठाने करण्यात आली.

## पनवेल महानगर प्रेस क्लबला वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार जाहीर

**पनवेल : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाला २०२५ चा आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार तर पनवेल महानगर प्रेस क्लबला वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.


वसंतराव काणे

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांना दरवर्षी पुरस्कारांनी गौरविले जाते. आठ महसूल विभागातून प्रत्येकी एका तालुका संघाची निवड केली जाते. यावेळी विशेष बाब म्हणून विदर्भातून दोन तालुका संघांना तसेच मुंबई उपनगरांतून एका पत्रकार संघाला सन्मानित केले जाणार आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यातून एका आदर्श जिल्हा संघाची निवड केली जाते. सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्कारांचे स्वरूप असून दरवर्षी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येते.

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल अशी माहिती अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे. या सोहळ्याला राज्यभरातून किमान हजार पत्रकार या सोहळ्यासाठी उपस्थित असतात पुरस्कार प्राप्त सर्व तालुका पत्रकार संघाचे एस.एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विशस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.

## नमुंमपा आयुक्तांच्याकडून निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता आठही विभागांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये कार्यान्वित झाली असून महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी या सर्व कार्यालयांना भेट देत निवडणूक विषयक सर्व बाबींची व सुविधांची पाहणी केली व मौल्यवान सूचना केल्या.

याठिकाणी आणखी आवश्यक असणाऱ्या सुविधांची तत्पर पूर्तता करण्याचे निर्देश संबधित अधिकाऱ्यांना दिले. या वेळी आयुक्त महोदयांसमवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड उपस्थित होते.



बेलापूर विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापासून पाहणीला सुरुवात करीत संपूर्ण दिवसभर आयुक्तांनी दिघा विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत आठही कार्यालयांना अथक भेटी देत पाहणी केली.

यामध्ये प्रत्येक विभागातील प्रभागनिहाय मतदान केंद्रांचा आढावा घेतांना त्याठिकाणी पुरेशा प्रमाणात क्षेत्रीय अधिकारी उपलब्ध असल्याबाबत त्यांनी खातरजमा केली. त्याचप्रमाणे आवश्यक क्षेत्रीय अधिकारी तत्परतेने पुरवावेत असेही निर्देश मनुष्यबळ व्यवस्थापन करणाऱ्या नोडल अधिकारी यांना दिले.सर्व आठही विभागात आचारसंहिता उल्लंघनावर काटेकोर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडीओ सर्विलन्स पथके कार्यान्वित झाली असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्याची सूचना आयुक्तांनी केली.

## कार्यकर्त्यांनी संयम राखा सोशल मीडियावर प्रतिक्रिया देऊ नका -सुनील तटकरे

**कर्जत : प्रतिनिधी**

'खोपोलीत काल घटना घडली ती अत्यंत निंदनीय आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मी या घटनेचा निषेध व्यक्त करतो. तपास यंत्रणेचे काम सुरु आहे. आपल्या जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षक एक कार्यक्षम अधिकारी आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली योग्य तो तपास होईल. या बद्दल माझ्या मनात संदेह असण्याचे काही कारण नाही.

सुधाकर घारे एक सुस्वभावी, जनतेची कदर असणारा जनतेला न्याय देणारा नेता म्हणून कर्जत – खालापूर तालुक्यात निश्चित पणाने आपले एक स्थान जन माणसात निर्माण केले आहे. तपास चालू आहे. त्यामुळे काही बाबतीत मर्यादेमध्ये बोलणे क्रमप्राप्त आहे. तुमच्या मनात अत्यंत अस्वस्थता आहे. याची मला जाणीव आहे. महापालिकेच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरु आहे. तरी मी येथे आलो आणि अत्यंत संयमाने बोलत आहे. श्रद्धा,




सबुरी, संयमामधून सत्य निर्विवादपणे बाहेर येईल. कुणीही आपली प्रतिक्रिया सोशल मीडियावर देऊ नये.' असा सल्ला प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी कार्यकर्त्यांना दिला.

काल खोपोलीत शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची घटनेत निघृण हत्या झाली. त्यामध्ये संशयित म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा प्रवक्ते भरत भगत यांची नावे आल्याने तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी कर्जत मधील जनसंपर्क कार्यालयात येऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. याप्रसंगी पुंडलिक पाटील, नितीन सावंत, अशोक भोपतराव, सुनील पाटील, भगवान भोईर, एकनाथ धुळे, अंकित साखरे, उमा मुंढे, दीपक श्रीखंडे, संतोष बैलमारे, रंजना धुळे आदी उपस्थित होते.

तटकरे पुढे म्हणाले, 'इथे महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या. त्या फार महत्वाच्या आहेत. या घटने बद्दल मी स्वतः मुख्यमंत्र्यांची भेट घेईन. त्यांच्या कडे एसआयटी ची मागणी देखील करीन. इथे जाहीरपणे बोलणे इच्छित नाही. तुमच्या पैकी अनेकांनी जे आता काही घडले आहे. त्याचा अनुभव वेगळा वेगळ्या पद्धतीने घेतला आहे. कारण सत्य हे सत्य आहे. सत्याची कास धरत त्याच्या पाठीमागे उभे राहणे हे प्रदेशाध्यक्ष म्हणून माझे हजार टक्के कर्तव्य आहे. त्यात तसूभरही कमी पडणार नाही. आपल्या नेतृत्वाच्या कार्यशैली बद्दल सर्वांना विश्वास आहे. महिला वर्गामध्ये आपली समज्यस्य भूमिका ते मांडत असतात. हे सर्वांना माहीत आहे. या घटने नंतर कुणी काय काय केले? हे बाहेरच येईल. यात शंका नाही.

आज सकाळ पासूनच राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात व परिसरात कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. सातत्याने ती वाढत होती.

दुपारी सव्वा चारच्या सुमारास सुनील तटकरे जनसंपर्क कार्यालयात आले. त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधला. त्यानंतर त्यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### सोशल मीडियावरून आणखी एक गंभीर प्रकार

*या हत्येनंतर सोशल मीडियावरून आणखी एक गंभीर प्रकार समोर आला आहे. खोपोली हत्या प्रकरणातील आरोपी सुधाकर घारे यांचे निकटवर्तीय महेंद्र घारे यांनी सोशल मीडियावरील एका कमेंटमध्ये पुढचा नंबर संकेत भासेचा असा धमकीचा मजकूर लिहिल्याचे निदर्शनास आले आहे. या धमकीमुळे कर्जत शहरातही भीती व अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर कर्जत येथील नगरसेवक संकेत भासे आणि कर्जत शहर शिवसेनेच्या वतीने कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच कर्जत पोलीस ठाण्यात लेखी निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात महेंद्र घारे यांच्यावर यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याचा उल्लेख करून, त्यांच्या सोशल मीडियावरील धमकीची सखोल चौकशी करून तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.*

# फेक वेबसाईटद्वारे नागरिकांना फसवणाऱ्या दुकलीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

कॉलगर्ल पुरवण्याच्या नावाखाली फेक वेबसाईटच्या माध्यमातून तामिळनाडू परिसरातील १८ नागरिकांची हजारो रुपयांची फसवणूक करणाऱ्या १३ जणांना पनवेल तालुका पोलिसांनी तिरुपुर सायबर पोलिसांच्या साहाय्याने अटक केली आहे.



तामिळनाडू मधील तिरुपुर सायबर पोलीस विभागाकडे काही जणांनी फेक वेबसाईटच्या माध्यमातून आपली फसवणूक झाल्याची तक्रार केली होती. यामध्ये एकूण १८ तक्रारदारांनी ५३ हजार रुपये लुबाडल्याची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे तिरुपुर सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सय्यद रफिक सिकंदन व महिला उपनिरीक्षक कनक वल्ली व त्यांचे पथक तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेत असताना अशाप्रकारच्या गुन्ह्यासंदर्भात पाँडिचेरी व कोईम्बतूर येथे दोघा जणांना अटक झाली असून ते सध्या पुन्हा ॲक्टिव्ह झाले असल्याची माहिती त्यांना मिळाली.

यानुसार त्यांचा शोध घेतला असताना महाराष्ट्रातील पनवेल मधील इंडियाबुल्स या सोसायटीमध्ये ते वास्तव्यास असल्याचे माहिती मिळाली. त्यांच्या पथकाने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात येऊन वपोनि गजानन घाडगे यांची भेट घेऊन त्यांना गुन्ह्यातील गांभीर्य सांगून पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या सायबर सेल व गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या पथकाला साथीला घेऊन इंडियाबुल्स या सोसायटीमधील मेरीगोल्ड या इमारतीमधील आठव्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये छापा टाकला असता तामिळनाडू परिसरात वास्तव्यास असलेली १३ जणे येथे एकत्रितपणे राहत असल्याचे आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता या गुन्ह्यातील मुख्य आरोपी प्रदीप याच्या माध्यमातून अश्याप्रकारेचे नियमित लोकांची फसवणूक करत असल्याचे आढळून आले. त्यात दोन मुख्य आरोपीसुद्धा आढळून आल्याने त्यांच्याविरोधात सायबर ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आले.

आरोपींना तिरुपुर सायबर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

> **आपली घरे भाड्याने देताना घरमालकाने जागरूक राहावे. तसेच त्याची नोंद जवळच्या पोलीस ठाण्यात करावी. एजेंटच्या माध्यमातून घरे भाड्याने देताना सुद्धा तो एजंट नोंदणीकृत आहे कि नाही याची खात्री करावी. त्याचप्रमाणे आपल्या शेजारी राहणाऱ्या परिवाराची वागणूक, वर्तणूक व वावर याकडे लक्ष ठेवावे. काही संशयास्पद आढळ्यास नजीकचे पोलीस ठाणे किंवा आपत्कालीन क्र ११२ यांच्यावर संपर्क साधावा. तक्रारदाराचे नाव गुपित ठेवण्यात येते.**
>
> **–गजानन घाडगे, वपोनि**

# नागरिकांना अपेक्षित विकासकामे भाजपच्या माध्यमातून होतात

## भाजप नेते एकनाथ देशेकर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना अपेक्षित असलेली सर्व विकासकामे भाजपच्या माध्यमातून पूर्ण करून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही भाजप नेते एकनाथ देशेकर यांनी चिंचवली येथे विकास कामांच्या शुभारंभावेळी दिली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून चिंचवली गावासाठी मंजूर झालेल्या विविध विकासकामांचा शुभारंभ शनिवारी भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यकुशल नेतृत्वाखाली पनवेल मतदारसंघात अनेक विकासाचे प्रश्न मार्गी लागत असून चिंचवली गावाच्या प्रगतीसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अंतर्गत १० लाख रुपयांच्या निधीतून विनायक ठेंबरे ते दीपक रिकामे यांच्या घरापर्यंत जाणारा रस्ता व गटार काँक्रिटीकरण, १० लाख रुपयांच्या निधीतून फुलचंद पाटील यांच्या घरापासून जाणारे गटार व रस्ता, तसेच १० लाख रुपयांच्या निधीतून स्मशानभूमी बांधण्याच्या कामाचे भूमीपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यासोबतच चिंचवली येथील १० लाख रुपयांच्या निधीतून पूर्ण झालेल्या रस्ता व गटाराच्या कामाचे आणि स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे लोकार्पणही यावेळी भूपेंद्र पाटील यांच्याश उपस्थित मान्यवर्णाच्या हस्ते झाले.



◆ **चिंचवली येथे कामांचा शुभारंभ**

या कार्यकमाला भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, एकनाथ पाटील, शशिकांत दिसले, गणू मुंडे, एकनाथ फराड, बळीराम भोईर, गणेश तातरे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, लहूशेठ पाटील, आत्माराम पाटील, बाळाराम कर्नूक, अनंता कर्नूक, गुरुनाथ पाटील, समीर मुंढे, अनंता मुंढे, विजय मुंढे, विलास भोपी, शिवाजी कर्नूक, निलेश वारदे, प्रणय जाधव, अशोक कर्नूक, सचिन दिसले, दीपक तवले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून होत असलेल्या या कामांमुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये मतदार जनजागृती स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे नुकतेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवून मतदानाबद्दल सकारात्मक संदेश दिला.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे चित्रकला, निबंध लेखन, पत्र लेखन, वक्तृत्व, रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी सर्जनशील कल्पनांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये प्रभावीपणे मांडली.

या वेळी मार्गदर्शन करताना शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी म्हणाले मतदान हा फक्त हक्क नाही, तर भविष्य घडवण्याची संधी आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची जाणीव निर्माण झाली, तर उद्या ते सजग व जबाबदार मतदार बनतील. या स्पर्धांनी त्यांची सामाजिक जाणीव नक्कीच वाढवली,

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मतदार जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि लोकशाहीबद्दल आदर निर्माण झाल्याचे समन्वयक शिक्षिका रूहल सिंह यांनी सांगितले. या वेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# गहाळ झालेले मोबाईल मुळ मालकांना केले परत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात नागरिकांचे मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण वाढले होते. या तक्रारींची दखल घेत पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या सीईआयआर प्रणाली पथकाने तांत्रिकदृष्ट्या शोध घेऊन तब्बल १५ लाख ४५ हजार रूपये किंमतीचे १०३ मोबाईल शोधण्यात यश मिळवले आहे. हे शोधण्यात आलेले मोबाईल शनिवारी सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक शाकिर पटेल आणि पोलीस निरीक्षक अभिजित अभंग यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक निरीक्षक प्रवीण फडतरे, शिपाई विशाल दुधे, सचिन कोर, हवालदार अमोल पाटील, संदेश म्हात्रे, तुषार बोरसे, मिथुन भोसले, किरण कराड, अभय सांगळे आणि पोलीस शिपाई प्रवीण पाटील यांच्या पथकाने केली आहे.



# आईने पोटच्या मुलीचा केला खून

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जन्मदात्या आईनेच सहा वर्षांच्या चिमुरडीचा गुदमरून खून केल्याचा प्रकार कळंबोलीतील सेक्टर १ मधील गुरूसंकल्प हाऊसिंग सोसायटीत समोर आला. मुलगी नको होती, ती व्यवस्थित बोलत नव्हती आणि हिंदी भाषेत बोलत असल्याने त्रास होत होता, अशा अत्यंत क्षुल्लक कारणांवरून या निर्दयी आईने आपल्या लेकीचा जीव घेतल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे या निष्ठूर व निर्दयी महिलेने बीएसस्सीपर्यंत शिक्षण घेतले आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी संबंधित महिलेला अटक केली आहे. कळंबोलीतील गुरूसंकल्प सोसायटीत आयटी अभियंता असलेले पती आणि बीएस्सी शिक्षण घेतलेली ३० वर्षीय पत्नी वास्तव्यास होते. २०१७ साली या दाम्पत्याचा विवाह झाल्यावर २०१९ मध्ये त्यांना कन्या झाली. सहा वर्षांची असणाऱ्या या मुलीला लहानपणापासूनच बोलण्यात अडथळा येत होता. ती मराठीऐवजी हिंदी भाषेचे शब्द उच्चारून हिंदी भाषेत अधिक बोलत असे. यामुळे तीची आई सतत नाराज होती.

मुलीच्या या अडचणींमुळे आई मानसिक तणावात होती आणि तिने अनेकदा पतीकडे अशी मुलगी नको असे सांगितल्याचे तपासात समोर आले आहे. पतीने मात्र तिला समज देण्याचा प्रयत्न केला होता.अखेर २३ डिसेंबरच्या रात्री या आईने मुलगी संपविण्याचा निश्चय केला. त्याच दिवशी आजी नातीला भेटण्यासाठी भेटवस्तू घेऊन तीची आजी घरी आली होती, मात्र तिची आणि बालिकेची भेट होऊ शकली नाही.

काही वेळाने पती घरी परतल्यानंतर झोपलेली मुलगी उठत नसल्याचे लक्षात येताच सर्वांनी तातडीने रुग्णालयात धाव घेतली. तेथे सुरुवातीला हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा बनाव करण्यात आला.मात्र कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांना या मृत्यूबाबत संशय वाटल्याने त्यांनी शवविच्छेदनाची विनंती केली.

प्राथमिक अहवालात श्वसनमार्ग अडथळ्याचे संकेत मिळताच आई–वडिलांची कसून चौकशी करण्यात आली. सुमारे सहा तासांच्या चौकशीनंतर अखेर आईनेच मुलीचा गुदमरून खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी या निर्दयी कृत्याबद्दल संबंधित आईला अटक करून पुढील तपास सुरू केला आहे. या महिलेवर मनोविकार तज्ज्ञांकडे उपचार सुरू असल्याचेसुद्धा तपासात समोर आले.

# सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात देवाचिये द्वारी या शीर्षकाखाली वार्षिक स्नेहसंमेलन २६ डिसेंबररोजी मोठ्या उत्साहात झाले. या सोहळा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

या वेळी संस्था कार्यकारिणी मंडळ सदस्य ॲड. राहुल घरत यांनी शाळेच्या माजी विद्यार्थी या नात्याने मनापासून आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच शिक्षण विभागाचे वरिष्ठ विस्तार अधिकारी सीताराम रामा मोहिते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा दिला. मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विद्यालयातील विविध स्पर्धा, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, विविधांगी उपक्रमांमध्ये, स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरित करून त्यांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमात आदर्शवर्ग प्राप्त वर्गातील दोन विद्यार्थिनी गार्गी म्हात्रे, निधी मोरे यांनी वर्गावरची सुंदर स्वरचित कविता सादर केली. तर डॉक्टर सीमा एन. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन देत आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात वर्षे सेवेत असलेल्या सेवानिवृत होणाऱ्या ज्येष्ठ शिक्षिका तनुजा तानाजी मोरे आणि वर्षे सेवेत असलेले प्राचार्य म्हणून आदर्शवत कार्यरत असणारे सेवानिवृत्त होणारे ज्येष्ठ प्राचार्य कैलास सत्रे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यानंतर व्दियालयातील विद्यार्थ्यांनी भक्ती रसातील देवाचिये द्वारी या आशयाला अनुसरून सक्हेसंमेलनामध्ये नृत्याविष्कार सादर केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गार्गी म्हात्रे हिने संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त मनापासुन शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थेचे सचिव डॉक्टर एस. टी. गडदे, कार्यकारिणी सदस्य स्वप्निल ठाकूर, माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष तुषार जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी विद्यार्थी अनिकेत म्हात्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक सुभाष मानकर, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनावणे, वैशाली पारधी, विद्यालयाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, स्वाती पाटील, सारिका दिवेकरयांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.





**मुंबई : माजी मुख्यमंत्री दिवंगत ए.आर. अंतुले यांचे नातू आणि नीलम व मुश्ताक अंतुले यांचे सुपुत्र अली यांचा विवाह अत्यंत उत्साहात झाला. या विवाह सोहळ्यानिमित्त मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथील ग्राउंडवर शुक्रवारी भव्य रिसेप्शनचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन नवदाम्पत्याला पुढील सुखी वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.**

# गव्हाण विद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाची साहसी प्रात्यक्षिके

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि.२६) नागरी संरक्षण दल रायगड तर्फे प्रथमोपचार व आपत्ती व्यवस्थापनाचे धडे साहसी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून इयत्ता पाचवी ते नववीच्या सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आले.



विद्यालयात हा अतिशय स्तुत्य आणि धाडसी उपक्रमात यावेळी उपमुख्य क्षेत्ररक्षक दत्ताराम गोंधळी यांचेसह रुमाजी डुमना (नागरी संरक्षण दल उरण), हरेश्वर ठाकूर (विभागीय क्षेत्ररक्षक उरण),केतन म्हात्रे (विभागीय क्षेत्ररक्षक पनवेल), राजेश म्हात्रे व ज्ञानेश्वर पाटील (चौकी क्षेत्ररक्षक) समीर थळी,निलेश घरत,नरेश शैलेंद्र पाटील, अभिमन्यू गोवारी (मानसेवी अधिकारी) त्याचप्रमाणे सुजल पाटील, मुद्रा पाटील, योगिता तांडेल, पूजा कडू (पेण) जान्हवी पाटील, यशश्री राव, वैष्णवी वर्तक, श्रेया भोपी,सानिया भोपी, प्रणाली सकपाळ, संकेत भगत, सुमित कोळी, राजेश म्हात्रे (पेण), श्रेयस पाटील, विजया पाटील, निकिता म्हात्रे, मिथुन म्हात्रे, आयुष मोहिते, रमाकांत कोळी, वैभव कोळी, अंबरनाथ भोईर, सायली घरत या सर्वांनी विद्यार्थ्यांना अतिशय धाडसी प्रात्यक्षिके करून दाखविली.

या वेळी विमोचन पद्धती, बनावटी स्ट्रेचर प्रथमोपचार व त्याच्या पायऱ्या, उंचावरून विमोचन, खुर्चीगाठीच्या सहाय्याने विमोचन, स्वतः रॅपलिंग च्या साह्याने विमोचन इत्यादी पद्धतीचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखवले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकडून करूनही घेतले. या वेळी संभाजी कराड, वैष्णवी चिकणे, ममराज खुटे आणि इतर विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकांमध्ये आवडीने सहभाग घेतला. या वेळी विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशांत ठाकूर यांनी केले तर लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी आभार मानले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी संरक्षण दलाच्या चमूचे पुष्पकुंडी देऊन स्वागत केले. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, सर्व शिक्षक वृंद उपस्थित होता.

# दागिने चोरीचा आरोप केल्याने अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

घरातील नातेवाईकांनीच दागिने चोरीचा संशय घेत १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा मानसिक छळ केल्याने या मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कळंबोली भागात घडली. कळंबोली पोलिसांनी या घटनेचा तपास करत मृत मुलीचे काका, काकू व चुलत बहिणीविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करत काकाला अटक केली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार दिनेश यादव (वय ४०) हे कळंबोली सेक्टर १४ मध्ये एकत्र कुटुंबासह वास्तव्यास आहेत. गेल्या २ सप्टेंबर रोजी यादव कुटुंबीयांच्या गणपतीचे विसर्जन सुरू असताना, काकू सुशीला यादव यांच्या घरातील पाच तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीस गेले. या चोरीचा संशय दिनेश यादव यांची १७ वर्षीय मुलगी मानसीवर घेण्यात आला होता. त्यामुळे काका रमेश यादव यांनी मानसीला आपल्या घरी बोलावून दागिने चोरीच्या संशयावरून तिला जाब विचारला होता. तसेच काकू व चुलत बहिणीने तिच्या चारित्र्यावर संशय घेत अत्यंत अपमानास्पद आरोप तिच्यावर केले होते. त्यानंतर रमेश यादव यांनी आपल्या पुतणीविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर मानसीला कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले होते तसेच मानसी व तिच्या मित्राविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

हा अपमान सहन न झाल्याने मानसीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. तिला तत्काळ कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला दाखलपूर्व मृत घोषित केले. या प्रकरणाचा कळंबोली पोलिसांनी तपास करत रमेश यादव (वय ६३), त्यांची पत्नी सुशीला यादव व मुलगी करिश्मा यादव या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आता रमेश यादव यांना अटक करण्यात आली आहे.

# गोष्ट न संपणारी

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील सर्वात जास्त महत्वाची गोष्ट, आवडत्या कलाकारावर त्याच्या चाहत्यांचे भरभरून प्रेम. राजेश खन्नावर तर समाजातील वरच्या स्तरापासून खालच्या माणसापर्यंत अनेकांनी बेहद्द प्रेम केले.

एक वेगळी गोष्ट सांगतो,आजही मी वांद्र्याच्या कार्टर रोडवरुन जातो तेव्हा माझे लक्ष हटकून राजेश खन्नाच्या बहुचर्चित अशा आशीर्वाद बंगल्याकडे जाते आणि आज त्या बंगल्याच्या कोणत्याच खाणाखुणा तेथे शिल्लक नसून एक उत्तुंग इमारत उभी राहिल्याचे दिसते तेव्हा वाईट वाटते. एका कोपर्यात कुठे तरी आशीर्वाद असे म्हटलयं. राजेश खन्नाची वैभवशाली बहुस्तरीय वाटचाल या इमारतीपेक्षाही खूपच मोठी आहे.

या बंगल्याबाबतची माझी आणखीन एक विशेष आठवण सांगतो. तो दिवस मी कधीच विसरु शकत नाही. साधारणपणे २०१२ च्या सुरुवातीची गोष्ट. तो अनुभव फारच वेगळा होता. राजेश खन्नाच्या वांद्र्याच्या कार्टर रोडवरील 'आशीर्वाद' बंगल्यासमोर ये असा एका पत्रकार मित्राचा मेसेज आला आणि कुतूहल जागं झालं. आता यावेळी तेथे काय असणार? राजेश खन्नाच्या चलतीच्या काळात मी त्याचा निस्सीम भक्त म्हणून कॉलेजच्या काळात मित्रांसोबत या बंगल्याबाहेर तासन तास उभा असे. माझ्यासारखे आणखीन काही त्याचे फॅन्सही असत आणि तो वेगळ्या शैलीचा आकर्षक बंगला पाहून परतत असे. माझे मन जुन्या आठवणीत गेले. पण आज काय असेल? तेथे आजही तशीच गर्दी होती, काही मिडियावाले होते, आमच्या सगळ्यांच्या नजरा बंगल्यावर लागल्या होत्या आणि अशातच अक्षयकुमार राजेश खन्नाला घेऊन सामोरा आला. काळा गॉगल लावलेला, डोळे खोलात गेलेला, नजर हरवलेली, गाल खूप आत गेलेला, उसने हास्य असलेला राजेश खन्ना असू शकतो हे पटत नव्हते, पण तेच 'दिसत ' होते. डोळ्यात अश्रू यावेत असे त्याचे दर्शन होत होते. त्याच्या पाठीमागे उभ्या असलेल्या डिंपलचा चेहराही हरवल्यासारखा होता. हे सगळे काय होते? तर राजेश खन्नामधल्या 'सुपर स्टार 'ला दाखवून द्यायचे होते की 'आजही त्याची जबरदस्त क्रेझ आहे'..... हा एक 'शो ' होता. या हिंदी चित्रपटसृष्टीनुसार हे घडत होते.

हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात राजेश खन्नाचा स्टारडम हा शब्दांत न मावणारा आहे. एक वेबसिरिज होईल अशीच त्याची बहुस्तरीय, बहुचर्चित, बहुरंगी, बहुढंगी, नाट्यमय अशी कलरफुल वाटचाल आहे. आमच्या गिरगावातील ठाकूरव्दार नाक्यावरच्या सरस्वती भुवनच्या तिसरा मजल्यावर राहणारा हा जतिन (त्याचे मूळ नाव) हिंदी चित्रपटसृष्टीतील टॉपच्या निर्मात्यांची युनायटेड प्रोड्युसर ही संस्था आणि फिल्म फेअर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या 'टॅलेंट हंट ' स्पर्धेत त्याने बाजी मारली आणि युनायटेड प्रोड्युसर्सनी त्याला आपल्या चित्रपटासाठी 'साईन ' केले. (सुभाष घई आणि धीरजकुमारही नंतरच्या स्थानावर निवडले गेले). सर्वप्रथम जी. पी. सिप्पी यांनी 'राज 'साठी (दिग्दर्शक भास्कर दवे) साईन केले ('राज'मध्ये अगोदर असलेल्या हीरोने चित्रपट सोडल्यावर सुभाष घईकडे हा चित्रपट आला. पण तोपर्यंत राजेश खन्नाची वर्णी लागली. बबिताचाही हा पहिलाच चित्रपट) पण चेतन आनंद दिग्दर्शित 'आखरी खत ' (१९६६) अगोदर झळकला आणि त्यावर्षी भारताची ऑस्करसाठीची प्रवेशिका म्हणून निवडला गेला. औरत, नौनिहाल, बहारो के सपने असे एकेक करत त्याचे चित्रपट प्रदर्शित होत होते, नासिर हुसेन यांनीही 'बहारो के सपने'साठी सुरुवातीला सुभाष घईलाच विचारले, पण तेथेही राजेश खन्ना आला. अशातच शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना ' (१९६९) आला आणि राजेश खन्ना पर्व सुरु झाले.... चित्रपटातील मेरे सपनो की रानी कब आयेगी तू , रुप तेरा मस्ताना प्यार मेरा दीवाना (गीतकार आनंद बक्षी, संगीत सचिन देव बर्मन) वगैरे गाणी आजही लोकप्रिय आहेत. 'आराधना'मध्ये मध्यंतरनंतरच्या पायलट राजेश खन्नाच्या मित्राच्या भूमिकेत सुभाष घई आहे. रॉक्सीमध्ये 'आराधना ' तुफान गर्दीत सुरु असतानाच राजेश खन्नाने गिरगाव सोडले आणि तो आशीर्वाद बंगल्यात राह्यला गेला. तो बंगला त्याने राजेन्द्रकुमारकडून विकत घेतला आणि त्याने बंगल्याचे 'डिंपल ' हे नाव बदलून 'आशीर्वाद ' केले आणि काही वर्षातच डिंपल कपाडिया त्याची पत्नी बनून या बंगल्यात राह्यला आली. या बंगल्यासाठी निर्माते बी. आर. चोप्रा यांनी त्याला चांगल्या मानधनात आपल्या बॅनरच्या 'इत्तेफाक'साठी साईन केले आणि दिग्दर्शक यश चोप्रा यांनी परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत सेट लावून अवघ्या काही दिवसात चित्रपट पूर्णही केला.....आजही 'इत्तेफाक ' तसाच रहस्यरंजक अनुभव देतो. राजेश खन्नाच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटातील हा एक आहे. राजेश खन्नाच्या यशात त्याच्या चित्रपटाच्या कथा आणि गीत संगीत यांचा विशेष वाटा आहे. आणि त्यातील राजेश खन्नाचा अभिनय रसिकांना विलक्षण भावला.

दो रास्ते, डोली, अमर प्रेम, बंधन, अपना देश, मर्यादा, आनंद, सफर, कटी पतंग, हाथी मेरे साथी, द ट्रेन, आन मिलो सजना, अंदाज, दुश्मन, अनुराग दाग....... राजेश खन्नाचा चित्रपट फक्त आणि फक्त खणखणीत रौप्यमहोत्सवी यश संपादण्यासाठी रिलीज होई. रसिक त्याचे चित्रपट पुन्हा पुन्हा एन्जॉय करीत. त्यातच त्याने दिग्दर्शक शक्ती सामंता यांच्यासोबत 'शक्तीराज' ही वितरण संस्था सुरु केली....वय वर्षे सात ते सत्तर असे त्याचे चाहते होते. काही तर वेडापिसे झाले होते. काही जणांनी तर 'आपण राजेश खन्नासारखे दिसावे' असे रुपडं आत्मसात केले होते. आमच्या गिरगावात चक्क चारजण 'डिट्टो ' राजेश खन्ना होते. क्रेझी होते. त्याचा गुरुशर्ट फेमस झाला, तो ज्या पध्दतीचे शर्ट परिधान करे लगोलग तशी शर्ट परिधान करण्याची फॅशन येई. युवतींमध्ये त्याची 'हिस्टेरिया ' म्हणजे वेड लागावे अशी क्रेझ निर्माण झाली. आशीर्वाद बंगल्याबाहेर त्यांची गर्दी असे, कधी बरे त्याची गाडी बाहेर पडतेय आणि उडणारी धूळ आपल्या कपाळी लावतोय असे होई, काही युवती आपल्या रक्ताने त्याला पत्र लिहून आपले प्रेम व्यक्त करीत, त्याला ढिगाने पत्र येत, स्टुडिओत त्याची गाडी शिरताच अनेक युवती त्याच्या गाडीचे चुंबन घेत..... क्रेझ, क्रेझ, क्रेझ म्हणजे काय असते ते हे असते. एक कलरफुल स्वप्न वाटावे असे वातावरण होते. फिल्म इंडस्ट्री त्याला 'काका ' नावाने हाक मारत. पंजाबी समाजात मुलासारखा गोंडस चेहरा असलेल्या व्यक्तीला काके म्हणतात. राजेश खन्नालाही काके





म्हणत, त्यावरुन काका झाला. आणि गाजला. बीबीसीने राजेश खन्नाच्या क्रेझवर एक माहितीपटही तेव्हा निर्माण केला असे त्याचे वलय होते. त्यात जे. ओम प्रकाश दिग्दर्शित 'आप की कसम 'चे काश्मीरमधील शूटिंग तसेच यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग'चा मिनर्व्हा थिएटरमधील ग्लॅमरस प्रीमियर पाह्यला मिळतोय.

१९७२ पर्यंत हा झंझावात राहिला आणि प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (मे १९७३) आणि हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक हराम' (१९७३) प्रदर्शित झाले आणि 'अमिताभ बच्चन नावाचा ॲन्ग्री यंग मॅन 'रसिकांना आवडला. 'नमक हराम 'च्या वेळी राजेश खन्ना आणि अमिताभ यांच्यात सरस कोण यावर दोघांचेही चाहते हमरीतुमरीवर येऊन वाद घालत. मिडियातूनही त्याची भारी चर्चा आणि तुलना रंगे.

दरम्यान, ओळीने जसे त्याचे चित्रपट धो धो चालले, तसेच तशाच ओळीने फ्लॉपही होऊ लागले. मेहबूब की मेहंदी, त्याग, मलिक, राजा रानी, मेरे जीवन साथी, हमशकल, बावर्ची, शहजादा वगैरे बरेच ..हा आश्चर्याचा मोठा धक्काच. होत्याचे अचानक नव्हते झाले. हा कौल प्रेक्षकांचा होता. त्यांना हे चित्रपट आवडले नाहीत.

१९७४ साली 'रोटी ', 'अजनबी ', 'प्रेम नगर ' 'आप की कसम 'च्या ज्युबिली हिटने राजेश खन्नाची वाटचाल व्यवस्थित सुरु होती. पण १९७५ च्या जानेवारीत यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार ' पडद्यावर आला तोच अमिताभ बच्चनचे दीर्घकालीन वादळ घेऊन आणि त्याच वर्षी १५ ऑगस्टला रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले ' आला तो वेगवेगळ्या संदर्भात आजही हिट आहे. या चित्रपटाने ॲक्शनपटाची लाट आली ( राजेश खन्ना मारधाडीला अनफिट) आणि मल्टी स्टार कास्ट चित्रपटाचे युग आले (जे राजेश खन्नाला मानवत नव्हते. सोलो हीरो हा त्याचा हट्ट आणि बाणा होता, आत्मकेंद्रीत राजेश खन्नाला ते मान्य नव्हतं. सगळे स्वत:भोवती हवे याची सवय आणि सातत्य सोडावे लागले असते ). राजेश खन्नाची प्रचंड मदार असलेल्या राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी' (१९७५) आणि शक्ती सामंता दिग्दर्शित 'मेहबूबा ' (१९७६) या दोन्ही बहुचर्चित आणि महत्वाकांक्षी चित्रपटांना रसिकांनी नाकारले आणि राजेश खन्नाची घसरण जाणवू लागली. गंमत म्हणजे या दोन्ही चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत....

सुपर स्टार म्हणून रसिकांत लोकप्रिय होत जाताना तो मूळ व्यक्तिमत्व विसरला. भरपूर यश असेही परिणाम करते. मूळात तो अतिशय समंजस व्यक्ती आणि अभिनयाची उत्तम जाण असलेला कसलेला अभिनेता. पण 'एकामागोमाग एक सुपर हिट चित्रपटां'नी आपले मूळ व्यक्तिमत्व, सामर्थ्य, स्वभाव, शैली विसरला आणि जणू तो ' आपण चोवीस तास राजेश खन्ना आहोत ' अशा स्टाईनने वागू शकतो अशा फाजील आत्मविश्वासात बोलू, पाहू, सांगू लागला. सुपर स्टार राजेश खन्नाचे मग कोणत्याही स्थितीत 'आपण राजेश खन्ना आहोत ' विसरता कामा नये असे झाले. आपल्या चित्रपटाच्या मुहूर्ताला अतिशय व्यवस्थित उशीराच येणे, शूटिंगला लेट करणे, दिग्दर्शकाला सतत सूचना देणे, निर्मात्याना तारखांसाठी रखडवणे, आपले चित्रपट पुढे मागे करणे अशा गोष्टी तो करु लागला आणि त्याचे हे वागणे उघडपणे असल्याने त्याची चर्चा रंगली, त्यावरुन किस्से/गोष्टी/कथा/दंतकथा वाढत अथवा पिकत गेल्या. त्याची इमेज 'लहरी आणि हेकेखोर' अशी झाली. 'नमक हराम 'च्या सेटवर अमिताभ वेळेवर येई, पण तो कंटाळून जावा अशा पध्दतीने राजेश खन्ना उशीराच येई, जाणिवपूर्वक रिटेक वाढवे यावर बरेच लिहिले गेले. एका मुलाखतीत तो म्हणाला, सेटवर वेळेवर यायला मी काय क्लर्क आहे काय? (मी तर सुपर स्टार आहे हे त्यातून तो सुचवतो.)

चांगल्या कथेवरील चित्रपट हाच राजेश खन्नाला मोठा आधार होता हे उशिरा लक्षात आले. इस्माईल श्रॉफ दिग्दर्शित 'थोडीसी बेवफाई ', मोहनकुमार दिग्दर्शित 'अवतार ', सावनकुमार दिग्दर्शित 'सौतन ', जे. ओम प्रकाश दिग्दर्शित 'आखिर क्यू' ही उदाहरणे बोलकी आहेत. पण राजेश खन्ना स्वतःला फोकसमध्ये ठेवण्यासाठी पब्लिसिटी स्टंट करे. आपल्या आशीर्वाद फिल्म या बॅनरखाली त्याने 'मजनून ' या चित्रपटाचा अक्षरशः जंगी मुहूर्त केला. वांद्रे स्टेशनबाहेर पडताच समोर 'मजनून 'चे भले मोठे होर्डींग्स दिसले, त्यावर म्हटले होते, एक नवा इतिहास घडतोय.... मेहबूब स्टुडिओ येईपर्यंत 'मजनून 'ची असंख्य पोस्टर आणि मग प्रत्यक्ष स्टुडिओत स्वागताला डिंपल सज्ज. त्या काळातील सर्व बडे निर्माते दिग्दर्शक वितरक मुहूर्ताला हजर दिसले आणि आमंत्रणारील वेळेपेक्षा दोन तास उशीर म्हणजे स्वाभाविक होतेच. आणि मग अतिशय देखण्या, खर्चिक, भव्य सेटवर संपूर्णपणे मेणबत्त्या आणि मग दिग्दर्शक कमाल अमरोही यांनी राजेश खन्ना आणि राखी यांच्यावर प्रेमाची शेरोशायरीचा प्रसंग.... दृश्य ओके होताच प्रचंड टाळ्या आणि सुखावलेला राजेश खन्ना. आणि काही दिवस मिडियात याची भरपूर चर्चा. पण पुढे काय? ही अमर प्रेम कथा मुहूर्तालाच बंद पडली. असाच त्याचा हिंदी चित्रपटातील जेम्स बॉण्डपट 'झीरो झीरो सेव्हन ' नावाचा ॲक्शनबाज मसालेदार चित्रपट. पद्मिनी कपिला त्याची नायिका होती. शंकर बी. सी. निर्मित आणि नरेंद्र बेदी दिग्दर्शित या चित्रपटाचाही धमाकेदार मुहूर्त बरेच दिवस गाजला, पण चित्रपट पुढे सरकलाच नाही. स्वतः ला जमेल तितकं न्यूजमध्ये ठेवण्याचा तो आटापिटा करतोय हे लक्षात येत होते. पण एक चित्रपट मात्र असाच भारी मुहूर्त होऊनही पूर्ण होऊन पडद्यावर आला. तो होता 'रेड रोझ ' ( १९८० ). दिग्दर्शक भारती राजाने आपल्या मूळ तमिळ चित्रपटाची हिंदीत रिमेक करताना मूळ नायक कमल हसनच्या हस्ते मुहूर्त केला. तोपर्यंत कमल हसन हिंदी चित्रपटसृष्टीत आला नव्हता. या चित्रपटासाठी राजेश खन्नाने आपला लूक बदलला. केस बारीक केले, गॉगल लावला, बोलण्याची ढब बदलली, महत्वाचे म्हणजे या चित्रपटात त्याने निगेटीव्ह व्यक्तिरेखा साकारली. हा सायकॉलॉजिकल थ्रीलर होता. पूनम धिल्लॉन नायिका होती. या धाडसी थीमला प्रेक्षकांनी नाकारले. पण राजेश खन्नाच्या या प्रयत्नांना दाद मिळाली. तरी चित्रपट यशस्वी होणे आवश्यक असतेच. चित्रपटाच्या जगात यशासारखे सुंदर आणि महत्वाचं काहीही नाही. ते मिळाले नाही की अडथळे निर्माण होतात. तेच राजेश खन्नाचे झाले.

कधी कधी राजेश खन्ना कोडे वाटायचा. खरं तर त्यानेच सत्तरच्या दशकात मिडियाला सेटवर शूटिंग कव्हरेजसाठी बोलवण्याचा ट्रेण्ड आणला. दुसरीकडे गॉसिप्सना खतपाणी घातले. तोच राजेश खन्ना कालांतराने त्याच्या चित्रपटाच्या सेटवर आम्ही सिनेपत्रकार गेल्यावर जाणीवपूर्वक अंतर ठेवून बसायचा आणि काय ते दिग्दर्शकाला विचारा असे कृतीतून दाखवून देई. तोच राजेश खन्ना आपल्या खारच्या ऑफिसामध्ये व्यवस्थित अपॉईनमेंट घेतली की हमखास भेटे. पण त्यासाठी किमान दीड दोन तास वाट पाह्यची तयारी हवी. पण त्याच्या ऑफिसमधील भरपूर आले आणि काही ड्रायफ्रूट कुटून टाकलेला गरम चहा तबियत खुश करे. त्या ऑफिसमधे मराठी वृत्तपत्र असल्याने वाटलेला आपलेपणा मग तो आज आपल्याला भेटत असलेला पत्रकार महाराष्ट्रीय आहे हे समजताच चांगल्या मराठीत बोले. त्यात मीही गिरगावकर आणि राजेश खन्नाचे गिरगावातील घर माहित असलेला त्यामुळे तो मनसोक्त मुलाखत देई. अधेमधे शिवी घातल्याशिवाय त्याला बोलता येत नसे, पण त्याला ते शोभत होते.

आपल्या चित्रपटाच्या सेटवर तो सवयीने उशीराच येई. आणि मग त्याच्या घरुन आलेल्या भल्या मोठ्या डब्यातील शाकाहारी आणि मांसाहारी जेवणाला एका मोठ्या टेबलावर मांडले जाई. कधी जोडीला रुपेशकुमार, शफी इनामदार, ओम शिवपुरी यापैकी कोणी असे. अशातच तो आजूबाजूला पाही आणि कोणी दिसलाच तर विचारे, 'खाना खाया? ' समोरचा हो अथवा नाही असे म्हणण्यापूर्वीच राजेश खन्ना त्याला प्लेट उचलायला सांगे.

राजेश खन्नातील असे अनेक चांगले गुण अनुभवता आले. मिडियाने मला हे दिले. त्याने आपल्या बॅनरखाली 'अलग अलग ' ( १९८५) ची निर्मिती करताना आपले मित्र शक्ती सामंता दिग्दर्शक, आनंद बक्षी गीतकार आणि राहुल देव बर्मन संगीतकार अशी टीम जमवली आणि मग त्याने निमिलेल्या चित्रपटात आपण फुकट गावू हे किशोरकुमारने दिलेले आश्वासन 'दिल मे आग लगाये सावन का महिना ' हे गाणे गात पूर्ण केले याची भरपूर चर्चा रंगली. या चित्रपटात टीना मुनिम नायिका आहे तर आपली मुलगी ट्विंकल हिच्या हस्ते या चित्रपटाचा त्याने थाटात मुहूर्त केल्याचे आठवतेय. त्या काळात नवीन चित्रपटाचे मुहूर्त जणू इव्हेन्टस असत.

एक वेगळी आठवण सांगतो. एकदा गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओत 'आवाम'च्या सेटवर शूटिंग कव्हरेजसाठी आम्हा सिनेपत्रकाराना बोलावले असता लंच ब्रेकमध्ये अचानक बाजूच्या 'इन्साफ'च्या सेटवरुन डिंपल आली आणि आम्ही सगळेच अचंबित झालो, फोटोग्राफर्सनी ताट बाजूला ठेवून कॅमेरा काढला, अहो ती चक्क राजेश खन्नाला भेटायला आली आणि ते पाहून शफी इनामदारही गोंधळून उभा राहिला. त्या काळात राजेश व डिंपल पटत नाही म्हणून वेगळे राहत असल्याने हे सगळे अनपेक्षित होते. ही तर 'ब्रेकिंग न्यूज 'च. हा फोटो त्या काळात भारी किंमतीत विकला गेला. गोष्ट छोटी वाटते पण महत्त्वाची आहे.

आपल्या 'जय शिव शंकर ' (१९८८) या चित्रपटात त्याने नायिका म्हणून डिंपल कपाडियाची निवड करुन सगळ्याच आश्चर्याचा धक्का दिला. मला चांगले आठवतेय, गोरेगावच्या फिल्म सिटीतील देवळात या चित्रपटाच्या मुहूर्ताला डिंपल अगोदर आली आणि राजेश खन्ना थोडा उशीरा आला याचीही बातमी झाली. अजूनही ते एकमेकांपासून वेगळे राहत असल्याने ते प्रत्यक्षात एकाद्या चित्रपटासाठी एकत्र येणे ही भारी फिल्मी बातमी होती. एस. व्ही. चंद्रशेखर राव दिग्दर्शित या चित्रपटातील या दोघांसह जितेंद्र, पूनम धिल्लॉन, चंकी पांडे, संगीता बिजलानी हेही यावेळी हजर होते तरी सगळा फोकस राजेश खन्ना आणि डिंपलवर होता. आम्हा प्रत्येक पत्रकाराला राजेश खन्ना व्यक्तीशः भेटला हे तर केवढे विशेष ठरले. हा चित्रपट पूर्ण तर झाला अगदी पोस्टरही लागली आणि रिलीजच्या आदल्या दिवशी आशीर्वाद फिल्मच्या ऑफिसवर इन्कम टॅक्सची धाड पडली आणि हा चित्रपट तसाच कायमचा डब्यात गेला....

नव्वदच्या दशकात राजेश खन्ना राजकारणातआला तो इंदिरा कॉंग्रेसचा समर्थक झाला. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत नवीन दिल्ली मतदारसंघातून तो भाजपचे उमेदवार लालकृष्ण अडवानी यांच्या विरोधात पराभूत झाला, पण अडवानी एकाच वेळेस गांधी नगर ( गुजरात) आणि नवी दिल्ली असे दोन्ही ठिकाणी विजयी झाले असल्याने त्यांनी दिल्लीचा राजीनामा दिला. मग पोटनिवडणुकीमध्ये त्याने भाजपचा उमेदवार शत्रुघ्न सिन्हाचा पराभव केला, विशेष म्हणजे यावेळी राजेश खन्नाच्या प्रचारात डिंपल आणि दोन्ही मुली ट्विंकल आणि रिंकी असा परिवार हजर असल्याचे फोटो वृत्त खूप गाजले. खासदार म्हणून त्याने चित्रपटसृष्टीत अनेकांना मदत मात्र केली.

राजेश खन्ना म्हणजे बरेच काही. प्रभाकर निकळंकर दिग्दर्शित 'सुंदरा सातारकर ' या मराठी चित्रपटात पाहुणा कलाकार म्हणून भूमिका साकारण्यापासून ते मेहमूदला 'जनता हवालदार 'च्या वेळी शूटिंगसाठी तारखाच न देण्यापर्यंत बरेच काही सांगता येईल. त्याचे दिग्दर्शक (अगदी अपवाद प्रकाश मेहरा, सुभाष घई... योगच आला नाही), त्याच्या कॉन्ट्रोव्हर्सी ( अबब.... किती किती, 'रोटी 'च्या वेळी दिग्दर्शक मनमोहन देसाईंशी वाद), त्याच्या नायिका (शर्मिला टागोर, मुमताज तर हुकमी पण नंतरच्या काळात स्मिता पाटीलसोबत 'अमृत ', 'अनोखा रिश्ता ', नजराना असे अनेक चित्रपट केले), त्याने अभिनित केलेली गाणी ( यह शाम मस्तानी..... कटी पतंगचे हे गाणे द बेस्ट), त्याचा संसार, त्यातली भांडणे त्यात तथ्य किती हा प्रश्नच होता. पण त्याची रोमॅन्टीक हीरो इमेज डॅमेज झाली), राजेश खन्ना हा कायमच कुतूहल आणि कौतुकाचा विषय राहिला आहे.

.....१८ जुलै २०१२ रोजी त्याच्या निधनाची बातमी समजताच आशीर्वाद बंगल्यावर गेलो तेव्हा समोर मिडिया आणि चाहत्यांची प्रचंड गर्दी होती. राजेश खन्ना हा कदापि न संपणारा विषय...

# भारतीय उद्योगपती रतन नवल टाटा



रतन टाटा (जन्म: २८ डिसेंबर १९३७, मुंबई – मृत्यू: ९ ऑक्टोबर २०२४, मुंबई) हे एक भारतीय उद्योगपती होते जे १९९१–२०१२ आणि २०१६–१७ या काळात चेअरमन झाले.टाटा ग्रुप , मुंबईस्थित एक समूह. देशातील सर्वात मोठ्या व्यावसायिक घराण्यांपैकी एकाचे नेतृत्व करण्यासाठी तसेच त्यांच्या महत्त्वपूर्ण परोपकारी कार्यांसाठी ते ओळखले जात होते. टाटांचा वारसा कॉर्पोरेट क्षेत्राच्या मर्यादेपलीकडे जाऊन लाखो सामान्य जीवनावर प्रभाव पाडतो. त्यांच्या आयुष्यात त्यांना भारतातील दोन सर्वोच्च नागरी सन्मान मिळाले – पद्मविभूषण ( २००८) आणि पद्मभूषण (२०००).

रतन टाटा हे भारतीय उद्योगपती आणि परोपकारी कुटुंबातील एक प्रमुख सदस्य होते.ज्यांना देशातील बहुतेक औद्योगिक प्रतिष्ठाने आणि पद्धतींचे प्रणेते म्हणून श्रेय दिले जाते. त्यांचे पणजोबा जमशेदजी टाटा यांनी १८६८ मध्ये टाटा समूहाची स्थापना केली – १९४७ मध्ये भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले तेव्हा टाटा स्टीलसह या छत्राखालील व्यवसायांनी राष्ट्र उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावली. नंतर रतन टाटांचे काका जेआरडी टाटा यांनी टाटा समूहाचा विस्तार केला , ज्यांनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा मोटर्स आणि टाटा सॉल्ट सारख्या प्रमुख उपकंपन्या स्थापन केल्या. टाटा समूहाच्या अग्रगण्य कामगिरीमध्ये प्रतिष्ठित ताजमहाल पॅलेस हॉटेल (१९०३, बॉम्बे आता मुंबई), वीज असलेले भारतातील पहिले हॉटेल आणि एअर इंडियाची स्थापना (१९३२) तसेच देशातील पहिला स्वदेशी सौंदर्यप्रसाधने ब्रँड, लक्मे (१९५२) यांचा समावेश होता.

मुंबईतील विविध शाळांमध्ये शिक्षण घेतल्यानंतर , टाटा यांनी १९५५ मध्ये न्यू यॉर्क शहरातील हायस्कूल पूर्ण केले . त्यानंतर त्यांनी कॉर्नेल विद्यापीठ , इथाका, न्यू यॉर्क येथे प्रवेश घेतला, जिथे त्यांनी भारतात काम करण्यासाठी परतण्यापूर्वी आर्किटेक्चरमध्ये बीएस (१९६२) पदवी प्राप्त केली. त्यांनी नोकरीवर व्यवसाय प्रशिक्षण घेतले, टाटा समूहाच्या अनेक व्यवसायांमध्ये अनुभव मिळवला आणि त्यापैकी एका, नॅशनल रेडिओ अँड इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचे प्रभारी संचालक (१९७१) म्हणून त्यांची नियुक्ती झाली. एका दशकानंतर ते टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्ष झाले आणि १९९१ मध्ये ते त्यांचे काका जेआरडी टाटा यांच्यानंतर टाटा समूहाची मूळ कंपनी टाटा सन्सचे अध्यक्ष झाले.

### टाटा समूहाचे नेतृत्व

भारताच्या विकासाच्या कथेतील एका महत्त्वाच्या काळात: अर्थव्यवस्थेचे उदारीकरण ,रतन टाटा टाटा सन्सचे अध्यक्ष बनले . विद्यमान वरिष्ठ नेतृत्वाकडून तीव्र विरोध झाल्यामुळे त्यांचा उदय रोखला गेला. त्यांनी निवृत्तीचे वय धोरण लागू करून, अहवाल संरचना बदलून आणि काही अधिकाऱ्यांना काढून टाकून सत्ता बळकट केली. टाटांनी आक्रमकपणे समूहाचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या व्यवसायांचे जागतिकीकरण करण्यावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. २००० मध्ये समूहाने लंडनस्थित टेटली टी ४३१.३ दशलक्ष डॉलर्समध्ये विकत घेतले आणि २००४ मध्ये त्यांनी दक्षिण कोरियाच्या देवू मोटर्सचे ट्रक–उत्पादन ऑपरेशन्स १०२ दशलक्ष डॉलर्समध्ये विकत घेतले. टाटा स्टीलने एका भारतीय कंपनीने मिळवलेले सर्वात मोठे कॉर्पोरेट अधिग्रहण पूर्ण केले जेव्हा त्यांनी महाकाय अँग्लो–डच स्टील उत्पादक कंपनीचे अधिग्रहण केले.२००७ मध्ये कोरस ग्रुपला ११.३ अब्ज डॉलर्समध्ये खरेदी केले. पुढच्या वर्षी टाटानेटाटा मोटर्सकडून प्रतिष्ठित ब्रिटिश कार ब्रँडची खरेदीजग्वार आणिलँड रोव्हर कडूनफोर्ड मोटर कंपनी . २.३ अब्ज डॉलर्सचा हा करार भारतीय ऑटोमोटिव्ह कंपनीने केलेला आतापर्यंतचा सर्वात मोठा संपादन होता.

टाटा हे पारशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय समुदायाचे होते , जे झोरास्ट्रियन धर्माचे अनुयायी होते आणि त्यांच्या सार्वजनिक सेवेच्या कार्यासाठी प्रसिद्ध होते. ते त्यांच्या परोपकारी हितसंबंधांसाठी ओळखले जात होते, ज्यामध्ये शिक्षण, औषध आणि ग्रामीण विकासातील संशोधन आणि सुधारणांना पाठिंबा देणे समाविष्ट होते. त्यांनी कर्करोगाच्या उपचारांना चालना देण्यासाठी रुग्णालये आणि संशोधन केंद्रे स्थापन केली आणि त्यांचा विस्तार केला. ते सामाजिक आणि आर्थिक असमानता कमी करण्यासाठी देखील वचनबद्ध होते. उदाहरणार्थ, २०२४ मध्ये टाटा समूहाने रतन टाटांच्या राज्यासाठीच्या दृष्टिकोनाचा भाग म्हणून आसाम राज्यात भारतातील पहिली स्वदेशी अर्धवाहक उत्पादन सुविधा बांधण्याची योजना जाहीर केली ; या गुंतवणुकीमुळे २५,००० हून अधिक स्थानिक रहिवाशांना रोजगार निर्माण होईल असा अंदाज होता.

टाटा ग्रुप आणि टाटा ट्रस्ट नावाच्या संबंधित परोपकारी समूहाने दिलेल्या देणग्यांमुळे अमेरिकन विद्यापीठांमध्ये विविध संस्था आणि शिष्यवृत्ती स्थापन झाल्या आहेत. यामध्ये कॅलिफोर्निया विद्यापीठ , सॅन दिएगो येथे जैविक आणि भौतिक विज्ञान संशोधन सुविधा आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलमधील एक कार्यकारी केंद्र समाविष्ट आहे – दोन्हीचे नाव टाटा हॉल आहे. कॉर्नेल विद्यापीठाला देण्यात आलेल्या देणगीतून भारतातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळते. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने कार्नेगी मेलॉन विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस हॉलला निधी मिळाला, ज्यामध्ये स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्स इन्स्टिट्यूट फॉर सॉफ्टवेअर रिसर्च आणि काही इतर सुविधा आहेत. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील टाटा सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अँड डिझाइन हे मर्यादित वीज, कमी उत्पन्न आणि कमी साक्षरता असलेल्या समुदायांना भेडसावणाऱ्या आव्हानांवर उपाय प्रदान करण्याचे काम करते.

२०२१ मध्ये टाटा समूहाने एअर इंडिया ताब्यात घेण्याची बोली जिंकली , ही विमान कंपनी मूळतः समूहाच्या मालकीची होती आणि त्यानंतर १९५३ मध्ये राष्ट्रीयीकृत झाली. तोपर्यंत अंतरिम अध्यक्षपदावरून पायउतार झालेल्या टाटांसाठी हा एक भावनिक क्षण होता. त्यांनी एक अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले ज्यामध्ये असे लिहिले होते:

भावनिकदृष्ट्या, श्री. जेआरडी टाटा यांच्या नेतृत्वाखाली एअर इंडियाने एकेकाळी जगातील सर्वात प्रतिष्ठित एअरलाइन्सपैकी एक म्हणून प्रतिष्ठा मिळवली होती. टाटा कुटुंबाला पूर्वीची प्रतिमा आणि प्रतिष्ठा परत मिळवण्याची संधी मिळेल. श्री. जेआरडी टाटा आज आपल्यामध्ये असते तर त्यांना खूप आनंद झाला असता.

टाटा हे प्राण्यांवरील, विशेषतः कुत्र्यांवर असलेल्या प्रेमासाठी ओळखले जात होते . टाटा यांनी आयुष्यभर प्राण्यांच्या कल्याणाचा पुरस्कार केला. टाटा समूहाचे मुख्यालय असलेल्या बॉम्बे हाऊसमध्ये, टाटांनी हे सुनिश्चित केले की भटक्या प्राण्यांना सुसज्ज कुत्र्यासाठी जागा उपलब्ध असेल आणि त्यांना परिसरात मुक्तपणे फिरण्याची परवानगी असेल. टाटांचा शेवटचा प्रकल्प म्हणजे मुंबईत २४ तास आपत्कालीन काळजी देणारे अत्याधुनिक प्राणी रुग्णालय, ज्याचे उद्घाटन २०२४ च्या मध्यात झाले.

### पुरस्कार आणि जागतिक मान्यता

पद्मभूषण आणि पद्मविभूषण यांसारख्या राष्ट्रीय पुरस्कारांव्यतिरिक्त, जगभरातील शैक्षणिक संस्थांकडून मानद पदव्या आणि भारतीय संघटनांकडून मिळालेल्या पुरस्कारांव्यतिरिक्त, टाटा यांना इतर देशांकडून खालील जागतिक मान्यता मिळाली.९ ऑक्टोबर २०२४ रोजी रतन टाटा यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# श्रीवर्धनमध्ये वाहतूक कोंडी, पार्किंगसाठी जागा नसल्याने पोलीस प्रशासन हतबल

**श्रीवर्धन : बातमीदार**

काल २५ डिसेंबर नाताळची सुट्टी पडल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती व श्रीवर्धन शहरात तसेच श्रीवर्धन तालुक्यात हरिहरेश्वर, दिवेआगर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची संख्या वाढली आहे.

दिवेआगर किंवा हरिहरेश्वर येथे येणारे पर्यटक आवर्जून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला भेट देतात. मात्र श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंग साठी जागा उपलब्ध नसल्यामुळे पोलीस प्रशासन देखील हतबल झाले आहे. श्रीवर्धन समुद्रकिनारा मार्गावरती वाहतुक पोलीस नेमून सुद्धा पर्यटक आपल्या गाड्या जबरदस्तीने समुद्रकिनारी घेऊन जात आहेत.



श्रीवर्धन नगरपरिषद शहराच्या प्रवेशद्वारावरती पर्यटकांकडून काही कर म्हणून रक्कम जमा करत असते. मात्र या बदल्यात श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे असताना नगरपरिषद प्रशासनाकडून या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे.

र.ना. राऊत विद्यालयाच्या पटांगणामध्ये पार्किंगची सुविधा तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून दिली होती. मात्र नगर परिषदेकडून मैदान साफ केले जात नसल्यामुळे त्या ठिकाणची स्वच्छता केली जात नसल्यामुळे शाळा प्रशासनाने मैदानाच्या बाजूला चर खोदून मैदानात पार्किंगचे प्रवेश बंद करून टाकले आहेत.

श्रीवर्धन नगर परिषदेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्याने सद्यस्थितीत असलेल्या मुख्याधिकाऱ्यांकडे श्रीवर्धन व म्हसळा या दोन्ही ठिकाणचा चार्ज असल्याने मुख्याधिकारी अनेक वेळा फोन रिसीव्ह करत नाहित. अनेक वेळा बातम्या प्रसिद्ध करून सुद्धा श्रीवर्धन येथील अवधूत मंदिराजवळ पर्यटकांकडून जेवण बनवण्याचे प्रकार सुरूच आहेत.

जर का हे प्रकार असेच सुरू राहिले तर हिंदुत्ववादी संघटनांकडून त्या ठिकाणी जेवण बनवणाऱ्या पर्यटकांना चोप दिला जाईल. असे हिंदुत्ववादी संघटनांकडून जाहीर करण्यात आले आहे.

पार्किंगच्या समस्येबाबत श्रीवर्धनच्या आमदार व महिला बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्याजवळ संपर्क साधून सदर प्रश्न मार्गी लावण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

परंतु अद्याप त्यांच्याकडूनही या प्रश्नावरती योग्य असा तोडगा निघालेला नाही.श्रीवर्धनच्या स्थानिक आमदार व महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे व श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने पर्यटकांच्या वहानांना पार्किंगसाठी सुविधा तातडीने उपलब्ध करून द्यावी म्हणजे रस्त्यावर वहाने उभी केल्याने वहातुक कोंडी होणार नाही, अशी मागणी केली जात आहे.

## गौतमी पाटीलचा कार्यक्रमातून काढता पाय; पोलिसांनी थांबवला कार्यक्रम

**महाड : प्रतिनिधी**

रायगड महोत्सव आयोजकांच्या वतीने महाड येथे प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांचा नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, मात्र सदर कार्यक्रम वेळेत बंद न केल्याने पोलिसांनी कारवाई करत कार्यक्रम बंद पाडला. यावेळी कार्यक्रमादरम्यान तरुणांची देखील हुल्लडबाजी महिलांना त्रासदायक ठरली.

शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर रोजी सायंकाळी भिलारे मैदान या ठिकाणी रायगड महोत्सव या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध लावणी नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सहा वाजता या निर्धारित वेळेत कार्यक्रम सुरू होणे अपेक्षित होते. मात्र आयोजकांकडून आठ नंतर कार्यक्रम सुरू करण्यात



आला तसेच पोलीस यंत्रणेकडून दिलेल्या परवानगीनुसार आठ वाजता कार्यक्रम बंद करण्याची वेळ असताना सदर कार्यक्रम दहा वाजेपर्यंत चालू ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाला तरुणांची हुल्लडबाजी सुरू होती अखेर रात्री दहा वाजता उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांनी स्पीकर बंद करून कार्यक्रम बंद केला. अचानक आवाज बंद झाल्याने गौतमी पाटील यांना आपले नृत्य थांबवावे लागले व तेथून काढता पाय घ्यावा लागला.

## माणगाव तळा कुंभार समाजाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**तळा : प्रतिनिधी**

श्री संत गोरा कुंभार हितवर्धक मंडळची नवनियुक्त कार्यकारणी निवड रमेश गोविलकर यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली यावेळी प्रथम मंडळाची विविध कामे ,असणाऱ्या अडीअडचणी व समाजहितासाठी राबविण्यात येणारे उपक्रम यावरती चर्चा झाल्यानंतर खालील प्रमाणे कार्यकारणी निवडण्यात आली आहे.मंडळाचे नवीन कार्यकारणी २१ डिसेंबर २०२५ रोजी माणगाव कुंभार आळी येथे संपन्न झाली. या कार्यकारणी मध्ये माणगाव व तळा कुंभार समाजाचे अध्यक्षपदी दिनेश रातवडकर यांची एकमताने निवड करण्यात आली. उपाध्यक्ष पदी महेंद्र बिरवाडकर व सनी



येळमकर तसेच सेक्रेटरी महेंद्र देवरुसकर यांची पुन्हा एकदा सेक्रेटरी या पदासाठी निवड करण्यात आली आहे. सह सेक्रेटरी नामदेव बामणोलकर खजिनदार निलेश रातवडकर सहखजिनदार सतीश वरवटकर ,सल्लागार ज्ञानेश्वर म्हशिलकर, सुभाष बामणोलकर महादेव गोविलकर, रामचंद्र तळकर ,यशवंत खैरकर ,जिल्हा सदस्य राजेश म्हाप्रळकर ,अरुण बामणोलकर यांनी अभिनंदन केले.

# नागोठणे विभागातील वणी ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**नागोठणे : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या शिवसेना पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नामदार भरतशेठ गोगावले व आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून रोहा तालुका प्रमुख ड. मनोजकुमार शिंदे, उप तालुका प्रमुख मनोज खांडेकर, युवा उद्योजक सुमित काते यांच्या



मार्गदर्शनाखाली नागोठणे विभागातील वणी गावातील ग्रामस्थांनी नुकतेच शिवसेनेत ( शिंदे गट ) प्रवेश केला असून सर्व प्रवेश कर्त्यांचे मनोज खांडेकर यांनी स्वागत करून पक्षात सर्वांना मानसन्मानाची वागणूक देऊन आपल्या विविध समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे आश्वासित केले. या प्रवेश सोहळा प्रसंगी युवा नेते सचिन भोसले , युवासेना तालुका सचिव मंदार कोतवाल, कडसुरे शाखाप्रमुख भानुदास शिंदे, नागोठणे विभाग संपर्कप्रमुख संजय कणघरे,युवासेना उपतालुका प्रमुख विशाल शिरसे,युवासेना उपविभाग प्रमुख प्रसाद जाधव, युवासेना शहर अधिकारी संदीप वाजे, युवासेना उपविभाग अधिकारी राज दुर्गावले आदी पदाधिकारी यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. दरम्यान नागोठणे विभागात शिवसेनेचा झंझावात चांगलाच सुरु आहे.

वणी ग्रामपंचायत माजी उपसरपंच विठोबा जाधव, माजी सरपंच जयेश जाधव, रमेश वनकर,मनोहर खामगावकर, नारायण धसाडे यांच्या उपस्थितीत वणी गावातील सौरभ खामगावकर,सुमित रेवाले,प्रथमेश कदम,भारत आवाद,रोहन रेवाले,दिपेश पांडे,ऋग्वेद आवाद,आदेश मांडलुस्कर,सन्नी मांडलूस्कर,आर्यन मांडलुस्कर,ऋषिकेश पाठारे, दिपेश दिघे,तेजस गुजर,अरुण रेवाले,भूषण घोगरे,सार्थक राऊत,आयुष भोस्तेकर,विघ्नेश कदम,साहिल राणे,आर्यन आवाद,रुद्र आवाद,दुर्वेश दिघे,महेश वनकर या तरुणांनी शिवसेना पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

या प्रवेश सोहळयामुळे नागोठण्यातील शिवसेनेत उत्साह निर्माण झाला असून वणी ग्रामस्थांच्या प्रवेशामुळे पक्षाला चांगलीच बळकटी मिळणार आहे तसेच पक्ष संघटना मजबूत करण्यास मदत होईल असा विश्वास उप तालुका प्रमुख मनोज खांडेकर यांनी व्यक्त केला.

## मुरूड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वीर बाल दिन साजरा



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड येथील वीर कोंडाजी फर्जंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थे तर्फे नुकताच वीर बाल दिवस साजरा करण्यात आला .या कार्यक्रमास श्रीराम पतसंस्थेचे सर व्यवस्थापक संजय ठाकूर, आय टी आय चे वरिष्ठ लिपिक हरिश्चंद्र नात्ती तसेच लाठी असोसिएशन रायगड या संघटनेचे अध्यक्ष प्रमोद मसाल , प्रशिक्षक प्रियांका गुंजाळ, राकेश भगत, तसेच संस्थेचे कर्मचारी गणेश पालकर, संकेत पालवणकर, पूजा माळी, स्वप्निल गुंजाळ, कृष्णा भुरे, संतोष मेहेतर इत्यादी उपस्थित होते . या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक विजेते कुमार मल्हार गुंजाळ, शिवम गुंजाळ, प्रियेश मसाल स्नेहा मसाल शिवतेज भगत यांनी लाठी प्रदर्शन दाखवून सर्व उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमात गुणवंत वीर बालकांना शाल, श्रीफळ, पुष्प व प्रमाण पत्र देऊन गौरव करण्यात आले . या कार्यक्रमा निमित्ताने संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांची निबंध, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून प्रथम विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक वाटप करण्यात आले

या कार्यक्रमात संजय ठाकूर यांनी २६ डिसेंबर हा दिवस गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र जोरवर सिंग व फतेह सिंग यांच्या हौतात्माचा सन्मान करण्यासाठी साजरा करण्यात येतो असे सांगीतले .

## अंजुमन इस्लाम जंजिरा मुरुड जंजिरा या संस्थेचा ११८वा स्थापना दिन उत्साहात साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

दरवर्षी अंजुमन इस्लाम जंजिरा मुरुड जंजिरा या संस्थेचा स्थापना दिन डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील शुक्रवारी साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने आज दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेच्या मुख्यालयात म्हणजेच अंजुमन इस्लाम जंजिराच्या शैक्षणिक संकुलात तौसिफ़ फत्ते यांच्या मार्गदर्शनखाली अत्यंत उत्साहात अंजुमन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अल्ताफ मलिक, अब्दुल रहीम कबले, तौसिफ़ फत्ते, इस्माईल शेख, अंजुमन डिग्री कॉलेज चे प्राचार्य डॉ. साजिद शेख, अंजुमन हायस्कूल व जुनिअर कॉलेज चे प्राचार्य वसीम सातारेकर, अंजुमन प्राथमिक स्कूलच्या मुख्याध्यापिका रक्षणदा खतीब, अंजुमन आय टी आय चे प्राचार्य इश्तियाक घलटे व अंजुमन चे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंजुमन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी तराणा–ए–अंजुमन या गीताचे गायन करून अंजुमन ची महिमा सर्वांसमोर मांडली. अब्दुलरहीम कबले यांनी सर्वाना अंजुमन दिनाच्या शुभेच्छा देत अंजुमन विषयी आपले मत व्यक्त केले. अंजुमन विषयी मनोगत व्यक्त करताना अंजुमन डिग्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल आढावा सर्वांसमोर मांडला. अंजुमन हायस्कूल व जुनिअर कॉलेज चे प्राचार्य वसीम सातारेकर व अंजुमन आय टी आय चे प्राचार्य इश्तियाक घलटे यांनीसुद्धा आपले विचार व्यक्त केले. सर्व पदाधिकाऱ्यांमार्फत अंजुमन दिनाच्या शुभेच्छा देऊन अंजुमन आय टी आय चे इंस्ट्रक्टर शाहिद कलाब यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. या वेळी प्रभात फेरीचे आयोजन केले होते.



## माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्थेचा अनोखा व प्रेरणादायी उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा खरा अर्थ कृतीतून जपणाऱ्या माणगाव तालुक्यातील शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्थेने समाजासमोर माणुसकीचा दीप उजळवणारा एक अनोखा आणि प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. गेल्या नऊ वर्षांपासून शिवजयंतीचे औचित्य साधून केवळ जल्लोष न करता रक्तदान शिबिराच्या माध्यमातून जीव वाचविण्याचे पवित्र कार्य सातत्याने सुरू आहे. या सेवाभावी उपक्रमातून आतापर्यंत तब्बल १,३४८ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून त्यातून २७७ गरजू रुग्णांना थेट रक्तपुरवठा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे २०१७ ते २०२५ या कालावधीत २७७ गंभीर आजारग्रस्त व मृत्यूशी झुंज देणाऱ्या रुग्णांचे प्राण वाचविण्यात या संस्थेचा मोलाचा वाटा आहे. रक्ताच्या एका थेंबानेही जीवन पुन्हा फुलू शकते हे संस्थेच्या या उपक्रमाने समाजाला ठामपणे दाखवून दिले आहे.



शिवजयंती उत्सव म्हणजे भव्य मिरवणुका,फटाक्यांची आतषबाजी,शिवज्योत व व्याख्याने ही सर्व परंपरा सर्वत्र पाहायला मिळते. मात्र माणगाव शहरातील पत्रकार सलीम शेख यांच्या अध्यक्षतेखाली शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद हे शिवजयंतीला रक्तदान शिबिराच्या माध्यमातून समाजहिताचा उत्सव म्हणून साजरा करते हे विशेष उल्लेखनीय आहे. या उपक्रमात सामाजिक संस्था,क्रीडा मंडळे,शिक्षण संस्था, व्यापारी,व्यावसायिक,तरुण–तरुणी तसेच सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात. विशेष म्हणजे दरवर्षी महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे समाधानकारक चित्र असल्याचे मत अध्यक्ष सलीम शेख यांनी व्यक्त केले. समाजातील प्रत्येक घटक रक्तदानासारख्या पुण्यकार्याशी जोडला जात असल्याने हा उपक्रम केवळ शिबिर न राहता मानवतेची चळवळ बनत चालला आहे. गेल्या नऊ वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर या दहाव्या वर्षीही १३ फेब्रुवारी २०२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे अशी माहिती यावेळी देण्यात आली. या पार्श्वभूमीवर २५ डिसेंबर २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह माणगाव याठिकाणी आयोजित बैठकीत या सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस शिवजयंती उत्सव सेवाभावी संस्थेचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्री बापूजी मंदिर चेरवली ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी पदयात्रा

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील साई सेवक पालखी चेरवली आयोजित श्री बापूजी मंदिर चेरवली ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी पदयात्रा सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दि.२ जानेवारी ते १० जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आली असल्याची माहिती सोहळ्याचे अध्यक्ष तथा खरवली ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष खडतर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सदरच्या पालखी पदयात्रा सोहळ्याचे प्रस्थान शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:२० वा.श्री बापूजी मंदिर चेरवली येथून होणार असून परतीचा प्रवास श्री क्षेत्र शिर्डी येथून शनिवार दि.१० जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वा. सुरु होणार आहे. हा पालखी सोहळा शुक्रवार दि.२ जानेवारी रोजी सकाळी ८ : २० वा. श्री बापूजी मंदिर चेरवली ते सी. एन. जी.पंप कोस्ते – सुधीर पवार फार्म हाऊस १२ किमी अंतर,सायंकाळी सी. एन. जी.पंप कोस्ते ते कांदळगाव खुर्द ११ किमी अंतर,शनिवार दि.३ जानेवारी रोजी सकाळी कांदळगाव खुर्द ते विंझाई माता मुळस्थान डोंगरवाडी असा करण्यात येणार आहे.



**मुरूड : नाताळ सुट्टीसाठी मुरूड पर्यटकांनी फुल्ल झाले आहे. सलग सुट्टी असल्याने जजिरा किल्ला पाहण्यासाठी तुडुंब गर्दी होती. पर्यटक सकाळपासून रागेत उभे होते. जंजिरा किल्ल्यात शिडाच्या बोटीतून जाण्याचा आनंद घेत होते.** (फोटो : सुधीर नाझरे)

# निवडणूक कामासाठी हजर न होणाऱ्या ७९ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ही दि.१५ जानेवारी २०२६ रोजी होत असून निवडणूकीच्या कामकाजाकरीता विविध प्रधिकरणांच्या अधिकारी, कर्मचारीवृंदाची नेमणूक करण्यात आलेली आहे. एकूण २८ प्रभागांमध्ये १११ सदस्य संख्येकरिता ११५१ मतदान केंद्रे असून निवडणूकीच्या विविध कामांसाठी कर्मचाऱ्यांना नेमणूक पत्रे देण्यात आलेली आहेत.

तथापी या नेमणूक पत्रानुसार निवडणूक कामकाजाकरिता हजर न झालेल्या ७९ अधिकारी, कर्मचारी यांना नोटीस बजावण्यात आली असून नोटीस मिळताच २४ तासाच्या आत नेमणूकीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा पोलीस स्टेशनमध्ये आपल्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना नोटीसेव्दारे देण्यात आलेली आहे.

निवडणूकीचे कामकाज हे कालमर्यादित व विहित वेळेत करावयाचे असल्याने सदर कामात अडथळा निर्माण होत असल्याचे लक्षात घेवुन निवडणूक कामात टाळाटाळ, हजगर्जीपणा व दिरंगाई करीत असल्याचे लक्षात घेवुन नोटीस मिळताच २४ तासाच्या आत नेमणूकीच्या ठिकाणी हजर व्हावे असे स्पष्ट निर्देशित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक सुव्यवस्थित रितीने संपन्न होण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका सर्वच बाबींची काटेकोर अंमलबजावणी करीत असून याचाच एक भाग म्हणून आवश्यक मनुष्यबळ उपलब्धतेच्या दृष्टीने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

# नवी मुंबई मनपा निवडणुकीसाठी कोपरखैरणेत पहिला अर्ज दाखल

## चार दिवसांत २१६५ नामनिर्देशनपत्रांचे वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता उमेदवारांना नामनिर्देशन पत्र देणे व स्विकारणेची प्रक्रिया २३ डिसेंबर २०२५ पासून सुरु झाली आहे. ही प्रक्रिया रविवार २८ डिसेंबर रोजीची सार्वजनिक सुट्टी वगळता २९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत व ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत सुरु असणार आहे. गेल्या चार दिवसांत २ हजार १६५ अर्जाचे वितरण झाले आहे. तर शुक्रवारी १ अर्ज इच्छुक उमेदवाराकडून कोपरखैरणे विभागात दाखल करण्यात आला.

निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांसाठी आवश्यक असलेले नामनिर्देशनपत्र व शपथपत्रांचे अद्ययावत नमुने उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती एकत्रितपणे कळावी यादृष्टीने उमेदवारांसाठी विशेष माहिती पुस्तिका तयार करण्यात आली असून ती सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांकडे उपलब्ध ठेवण्यात आली आहे. यामध्ये नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रांचे नमुने आणि इतर नमुने उदा. उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज, निवडणूक प्रतिनिधी व मतदान प्रतिनिधी नेमणूकीचे नमुने, मतपत्रिकेवर नाव छापण्याचा नमुना, पक्षाच्या उमेदवाराने सादर करावयाचे जोडपत्र १ व जोडपत्र २ नमुना अशा विविध माहितीचा व नमुन्यांचा अंतर्भाव या माहिती पुस्तिकेमध्ये आहे.

त्याचप्रमाणे आदर्श आचार संहितेबाबत एकत्रित आदेश, अर्हता - अनर्हता, प्रभागनिहाय आरक्षणाची आदी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता व नेमून दिलेले प्रभाग, प्रसार माध्यम सनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश अशाही विविध आदेशांचा समावेश या पुस्तिकेमध्ये आहे. १०० रुपये इतक्या दराने ही उमेदवारांसाठीची माहितीपुस्तिका निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.

**विभागनिहाय आकडेवारी**

२६ डिसेंबरपर्यंत आठ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातून २,१६५ नामनिर्देशनपत्रे वितरीत झाली आहेत. यामध्ये बेलापूर विभागातून २९१, नेरुळ : ३७३, वाशी : २१४, तुर्भे : ३६३, कोपरखैरणे : २९९, घणसोली : २०१, ऐरोली : २३५ व दिघा : १८९ याप्रमाणे नामनिर्देशनपत्रे वितरण झाले आहे.

# रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत गव्हाण विद्यालयाची सरशी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत बुधवार २४ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या आठ विद्यार्थ्यांनी बाजी मारली असून मराठी भाषेतून लहान गटात इयत्ता सातवीतील आरोही बापू नाळे तर मोठ्या गटात स्मित कुंदन मोकल यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून एकूण आठ स्पर्धक विजेते ठरले. मराठी,हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेत एकूण आठ स्पर्धक वक्ते विजेते ठरले.

विद्यालयाचे गट निहाय विजेते लहान गट मराठी भाषा -आरोही बापू नाळे (प्रथम) हिंदी भाषा - आलिया परवीन खान (तृतीय) व श्रीधर चंद्रकांत सुतार (उत्तेजनार्थ) इंग्रजी भाषा सात्विक रवींद्र भोईर (द्वितीय) मध्यम गट : मराठी भाषा - स्मित कुंदन मोकल (प्रथम) हिंदी भाषा- सिद्धांती चंद्रकांत सुतार (द्वितीय) इंग्रजी भाषा - अनुष्का राजेंद्र आव्हाड (द्वितीय) वसाईशा संतोष घोलप (उत्तेजनार्थ)

या वर्षी कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत घेण्यात येणाऱ्या रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज येथे करण्यात आले. या वेळी रायगड विभागातील संस्थेच्या शाळांतून २१० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले. गव्हाण शाखेतून आठही विजेत्या स्पर्धकांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, विद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले आदींनी सर्व विजेत्या स्पर्धकांचे तसेच वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे व उज्वला म्हात्रे, विशेष मार्गदर्शिका सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील आदींचे अभिनंदन केले.



# केडी आर्ट्स अकॅडमीतर्फे नाताळ कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे केडी आर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातून आयोजित नाताळ कार्यशाळेत चिमुकल्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कागद, पुठा तसेच इतर साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांनी सांताक्लॉज आणि नाताळचा गोठा (ख्रिसमस क्रीब) तयार केला. वय वर्षे ४ ते १६ या वयोगटातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

नाताळ पर्यावरणपूरक कार्यशाळा केडी आर्ट्स अकॅडमी आणि स्टुडिओ यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाला पॅन आर्ट मटेरिअल अँड सप्लाय यांचे सहकार्य लाभले. ही कार्यशाळा हाऊसफुल ठरली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी सांताक्लॉज आणि नाताळचा गोठा (ख्रिसमस क्रीब) यांची पर्यावरणपूरक क्राफ्ट मॉडेल्स तयार करताना मनसोक्त आनंद घेतला. सर्जनशील उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांनी स्वादिष्ट गोवन ख्रिसमस मिठाया तसेच पारंपरिक नाताळचा फराळही मनापासून आस्वादला.

केडी आर्ट्स अकॅडमी आणि स्टुडिओ यांच्या वतीने आयोजित केलेली ही कार्यशाळा या वर्षातील शेवटची कार्यशाळा होती. पनवेलमधील युवा चित्रकार केविन डायस यांच्या पुढाकाराने ही ख्रिसमस विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या वेळी रूपाली गाडगे यांनी विद्यार्थ्यांना क्राफ्टविषयक मार्गदर्शन केले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. लहान मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने अशा प्रकारच्या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आल्याचे केविन डायस यांनी सांगितले.

# जांभिवली शाळेचा कायापालट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनर वॉईस सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्याकडून जांभिवली शाळेचा कायापालट करण्यात आला.

जांभिवली शाळेचा शैक्षणिक व भौतिक दर्जा वाढविण्याच्या उद्देशाने इनर वाईस सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्याकडून शाळेला रंगरंगोटी, शौचालय दुरुस्ती, ग्रील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व खेळाचे साहित्य, अंगणवाडीतील मुलांना स्कूल बॅग व वॉटर बॉटल व इतर साहित्य तसेच डिजिटल क्लासरूम, ग्रीन बोर्ड, घंटा, घड्याळ, फॅन, ट्यूब अशाप्रकारे भरघोस सहाय्य करून जांभिवली शाळेचा कायापालट केला.

या शाळा नूतणीकरण कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा २४ डिसेंबर रोजी जांभिवली शाळेत पार पडला. या कार्यक्रमासाठी फाउंडेशनचे अध्यक्ष सुयोग कारंडे, सेक्रेटरी श्रीगणेश खंदारे, खजिनदार निलेश शिंदे, एलएएचएसचे डायरेक्टर गुलाबराव जाधव फाउंडेशनचे उपाध्यक्ष व्ही. एन.



घनवट, सहसचिव प्रकाश रोकडे, मुकुल साळुंखे, दिक्षा मोरे, सरस्वती हेब्बर, वावेघर केंद्राचे केंद्रप्रमुख काशिनाथ जाधव, माजी केंद्रप्रमुख सु.म. जोशी, वावेघर केंद्रातील शाळांचे मुख्याध्यापक, जांभिवली शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य ग्रुप ग्रामपंचायतचे ग्राम अधिकारी तसेच सरपंच, उपसरपंच व सर्व कर्मचारी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इनर वॉइस फाउंडेशनच्या सर्व प्रतिनिधींनी शिक्षण क्षेत्र बळकट करण्याचा मानस व्यक्त केला.

# खस्ता आत्मकथनचे आज प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

साहित्य विश्वात एका संवेदनशील आणि वास्तववादी आत्मकथनाची भर पडणार आहे. प्रसिद्ध लेखक व कवी धनराज खरटमल यांचे 'खस्ता' हे आत्मकथनचे २८ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबईच्या वाशीतल्या प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालयाच्या साहित्य मंदिर सभागृहात प्रकाशन होणार आहे. या आत्मकथनातून लेखकाने आपल्या आयुष्यातील संघर्ष, अनुभव, चढ-उतार आणि जीवनाने दिलेल्या शिकवणी अत्यंत प्रांजळपणे मांडल्या आहेत.

या पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने अपयशातून शिकलेले धडे, संघर्षातून घडलेली जडणघडण आणि यशाच्या दिशेने केलेला प्रवास मांडला आहे. त्यामुळे नव्या पिढीसाठी हे पुस्तक प्रेरणादायी ठरण्याची शक्यता आहे. आत्मकथन नामवंत अशा ग्रंथाली प्रकाशनातर्फे ५१व्या वाचकदिनी प्रकाशित करण्यात येत आहे.

# खानाव, उसर्ली येथील विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे विकासकामांची गंगा वाहत असून शनिवारी (दि.२७) खानाव आणि उसर्ली येथील सुमारे ५२ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील आणि भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हे भूमीपूजन व लोकार्पण उत्साहात झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात सुरू असलेल्या विकासकामांच्या झंझावातामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण होत आहे. त्यानुसार खानावमध्ये १० लाख रुपयांच्या निधीमधून रस्ता काँक्रिटीकण, १२ लाख रुपयांच्या निधीमधून स्मशानभुमी सुशोभीकरण, ३० लाख रुपयांच्या निधीमधून






उसर्ली स्टॉप ते गावापर्यत्तच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे या कामांचे भुमीपूजन तसेच दोन सोलार हायमास्ट तसेच १५ सोलार स्टीट लाईटचे लोकार्पण शनिवारी मान्यवरांच्याहस्ते झाले.

खानाव येथे झालेल्या या कार्यक्रमावेळी भाजप नेते एकनाथ देशेकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, युवा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, सरपंच नामदेव पाटील, भालचंद्र सिनारे, अशोक पाटील, लक्ष्मण पाटील, पांडुरंग पाटील, नरेश सोनावणे, रवी पाटील, बाबू मुबईकर, लहू पाटील, कोंडीराम पाटील, भगवान खानावकर, कानू रंधवी, सुरेश पाटील, परशुराम चोरघे, योगेश पाटील, अनिकेत देशेकर, रोहिणी खाणे, दीपिका खाणे आदी उपस्थित होते. उसर्ली येथे झालेल्या भुमीपूजनावेळी माजी सरपंच शांताराम पोपटा, नितीन काठावले, सरपंच बेबी ठाकुर, सदस्य रेश्मा पाटील, प्रितेश डांगरकर, उपसरपंच किरण डांगरकर, पोलिस पाटील, दिपक पाटील, माजी उपसरपंच लहू ठाकूर, रेशन पोपेटा, शशिकांत दळवी, दिनेश काठावले, दिपक तांबोळी, दत्तु काठावले, पांडूरंग काठावले, बुधाजी काठावले, सुनिल काठावले, अनंता काठावले, रविंद्र काठावले, मनोहर बडेकर, कृष्णा बडेकर, कच्छिंद्र ठाकुर, बाळाराम ठाकुर, आत्माराम ठाकुर, श्याम ठाकुर, अनंता ठाकुर, योगेश ठाकुर, शिवाजी ठाकुर, भगवान पाटील, संतोष पाटील, सचिन पाटील, अमीत लबडे, राहूल लबडे, प्रविण वारदे राहूल निंबाळकर, दक्ष ठाकुर, सोहम काठावले, सायली दळवी, रसिका ठाकुर, विजया ठाकुर, ममता ठाकुर, नंदा ठाकुर, सुनंदा दळवी, मनश्री ठाकुर, वेदिका ठाकुर उपस्थित होते.

विकासकामांबद्दल स्थानिक नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# साईनाथ पवार यांना पुरस्कार जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



समाज कल्याण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथे कार्यरत असलेले साईनाथ पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून दिव्यांग क्षेत्रात अत्यंत निष्ठेने व समर्पित भावनेने कार्यरत आहेत. दिव्यांग व्यक्तींच्या समस्या, हक्क, पुनर्वसन तसेच सामाजिक न्यायासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय व प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या या समाजोपयोगी कार्याची दखल घेत दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या वतीने यंदाचा मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार २०२५ साईनाथ पवार यांना जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार सोहळा २५ जानेवारी २०२६ रोजी मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे होणार आहे. कार्यक्रमाला नामवंत कलाकार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध क्षेत्रांतील दिग्गज व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. साईनाथ पवार यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाल्याने दिव्यांग क्षेत्रात तसेच सामाजिक स्तरावरून त्यांच्यावर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# कोळी बांधवांनी घेतले वेताळ देवाचे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**



अथांग खोल समुद्राच्या मध्यभागी वसलेल्या ऐतिहासिक खंदेरी किल्ल्यावर दिवाळे कोळीवाड्यातील कोळी बांधवांनी वेताळ देवाचे भक्तीभावाने दर्शन घेतले. पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार शनिवार (दि. २७) पहाटेच्या सुमारास कोळी बांधव आपल्या होड्या घेऊन खंदेरी किल्ल्याकडे रवाना झाले. पारंपरिक वेशभूषेत धार्मिक विधीव्रत पूजाअर्चा करत वेताळ देवाच्या चरणी नतमस्तक होत सुख-समृद्धी व सागरी सुरक्षिततेसाठी प्रार्थना केली.

अलिबाग तालुक्यातील थळ गावापासून काही अंतरावर खोल समुद्राच्या मधोमध ऐतिहासिक खंदेरी किल्ला वसलेला आहे. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या किल्ल्यावर प्राचीन स्वयंभू वेताळ देवाचे मंदिर आहे. दरवर्षी मुंबई, नवी मुंबई, ठाणे तसेच रायगड जिल्ह्यातील कोळी बांधव कुटुंबीयांसह मोठ्या श्रद्धेने येथे दर्शनासाठी जात असतात. या वेळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात वेताळ देवाला हार, नारळ आणि विविध पाच फळांचा मानपान अर्पण करून येथील वेताळ देवाच्या धार्मिक पूजेसह होडीची पूजा केली जाते. या वेळी, कोळी संस्कृतीचे अनोखे दर्शन झाले.

दरम्यान, वेताळ देव हें कोळी समाजाचे आराध्य दैवत मानले जाते. खोल समुद्रात जाणारा कोळी बांधव सुरक्षित राहावा आणि मासेमारीचा हंगाम यशस्वी जावा, खवललेला समुद्र शांत व्हावा. आणि माझा कोळी राजा सुखरूप घरी यावा. तसेच कुटुंबांवर देवाची कृपादृष्टी राहावी, यासाठी खंदेरी किल्ल्याला भेट देऊन वेताळ देवाची धार्मिक पूजा-अर्चा करण्यात आली. यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

कोळी बांधवांचं आणि समुद्राच एक वेगळे नाते आहे. त्यामुळे, आई एकविरा आणि खंडोबा देवासह खंदेरी किल्ल्यावरील वेताळ देवाच्या दर्शनासाठी दरवर्षी मोठ्या भक्तीभावाने ठराविक एक दिवशी दर्शनासाठी येण्याची परंपरा आजही कोळी बांधवांनी जपली आहे. या वेळी, आपल्या परंपरेचे जतन करत पुढील पिढीपर्यंत ही श्रद्धा टिकवून ठेवण्याचा संकल्प केल्याचं रुपाली राजेंद्र कोळी यांनी या वेळी सांगितले.

# प्रजापिता ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळातर्फे मोफत दिनदर्शिका

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील केगाव -विनायक येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळा वतीने सालाबादप्रमाणे मोफत दिनदर्शिका वाटप करण्यात आले.

अध्यात्मातून समाज सेवा या भावनेतून नियमितपणे सेवा केली जाते असे ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळाचे विश्वास भाई यांनी सांगितले. सरकारी कार्यालय, शाळा व सार्वजनिक कार्यालयात तसेच मंदिर अश्या ठिकाणी दिनदर्शिकेचे मोफत वाटप केले जाते. ओम शांतीचे नेहमीच प्रचार करीत असतात.

दरवर्षी उन्हाळी सुट्टीनिमित्त ७ दिवसीय राजयोग शिबिर घेतले जतात. गरजू व गरीब मुलांना वह्या व शालोपयोगी वस्तू वाटप, १० वी व १२ वी त ७५ टक्के हून जास्त मार्क्स मिळविलेल्या विद्यार्थांचा



गुणगौरव सोहळा व मार्गदर्शन केले जाते. दरवर्षी आपला वाढदिवस विशेष मुलांच्या शाळेत व वृद्धाश्रम येथे जावून खाऊ वाटप करून भेटवस्तू व मदत करून साजरा केला जातो, असे ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळाचे विश्वास भाई यांनी सांगितले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# आमदारकी नव्हे तर जनतेची सेवा हा आमचा व्यवसाय -भाजप नेते पंडीत पाटील

**रोहा : प्रतिनिधी**

लोकप्रतिनिधीनी जनतेची विकासकामे करण्यासाठी उत्सुक असल्यास जनतेकडून भरघोस प्रेम मिळते याचा अनुभव आज मला आला आहे. जनतेचे आमच्यावरील प्रेम पाहून मन भरून आले आहे. आज कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला असून लवकरच सर्व विकासकामे पूर्ण होतील. आमदारकी नव्हे तर जनतेची सेवा हा आमचा व्यवसाय असल्याचे प्रतिपादन माजी आमदार पंडीत पाटील यांनी व्यक्त केले.



रोहा तालुक्यातील चणेरा विभागातील विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा प्रसंगी कोकबन येथील बापदेव मंदिराच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात मा.आ. पंडीत पाटील बोलत होते.

यावेळी माजी राजिप सदस्या भावना पाटील, कोकबन सरपंच तेजस्विनी वाजंत्री, रोह्याचे माजी उपनगराध्यक्ष वसंत शेलार, रोह्याचे माजी शहर अध्यक्ष यज्ञेश भांड, अल्पसंख्यांक सेल जिल्हा अध्यक्ष लियाकत खोत, युवक उपाध्यक्ष नंदेश यादव, जितेंद्र जोशी उपस्थित होते.

या वेळी चणेरा विभागात अंतर्गत रस्ते, गटारे, नवीन डीपी, शाळा तसेच अंगणवाडी अशा विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले.सर्व नागरिकांनी पंडितशेठ पाटील व भावना पाटील यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या कार्यक्रमास लियाकत खोत, नंदेश यादव, जितेंद्र जोशी, अतुल पाटील, सुहास भगत, मंगेश मोहिते, शशिकांत कडू, कृष्णा चोगले, निलम वारगे, संदीप खेरटकर, विलास सावंत, किरण जाधव, संदीप कदम यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह सहभाग घेतला.या दौऱ्यात पंडीत पाटील यांनी महादेवखार माजी सरपंच नारायण गायकर, जाकीर खोत, पांडुरंग पवार यांच्या घरी सांत्वनपर भेट दिली.

## रिस कांबा सदनिका बांधकामात फसवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गृहप्रकल्पासाठी मंजूर केलेले बांधकाम न करता फसवणूक केल्याप्रकरणी चौघा जणांवर रसायनी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी संजय शेखर घाडी (रा.नवीन पनवेल) यांनी रसायनीतील रिसकांबे येथील हेरंब गुरुकृपा कॉम्प्लेक्समध्ये सदनिकेची नोंदणी केली होती. हेरंब गुरूकृपा कॉम्प्लेक्स या प्रकल्पास नगररचनाकार अलिबाग यांचे कडुन मंजुर करून घेतले होते. मात्र त्याप्रमाणे काम न करता नकाशामध्ये परस्पर बदल करुन सदनिकांची विक्री करुन फसवणुक केली.

या बाबत रसायनी पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक अनुसया ढोणे हे करीत आहेत.

## पाली ग्रामीण रुग्णालय व बसस्थानकाच्या मागणीसाठी १९ जानेवारीला आंदोलन

**सुधागड : प्रतिनिधी**

पाली ग्रामीण रुग्णालयाच्या कामास गती द्यावी आणि पाली बस स्थानकाच्या बांधकामाबाबत ठोस निर्णय घ्यावा, या दोन प्रमुख मागण्यांसाठी १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पाली तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

हे आंदोलन सत्यशोधक वारकरी महासंघ यांच्या वतीने, महेश महाराज पोंगडे यांच्या नेतृत्वाखाली आणि सुधागडमधील सामाजिक कार्यकर्त्यांच्या संयुक्त पुढाकाराने होणार आहे. कोणत्याही राजकीय पक्षाच्या बॅनरखाली न होता, सुधागड तालुक्याच्या जनतेच्या वतीने हे आंदोलन पार पडणार आहे. या आंदोलनात हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी होणार असून, शांततेच्या मार्गाने लोकशाही पद्धतीने आपली मागणी मांडली जाणार आहे. पोंगडे महाराज यांनी जनतेला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे: १. पाली ग्रामीण रुग्णालयाचे काम अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. हे काम तातडीने पूर्ण करून रुग्णालय लवकरात लवकर जनतेच्या सेवेसाठी सुरू करण्यात यावे. २. पाली बस स्थानकाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करून प्रवाशांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

या आंदोलनात सुधागड तालुक्यातील विविध गावांतील नागरिक, सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला मंडळे आणि विविध घटक सहभागी होणार आहेत.

# मुरुडमध्ये होणार पर्यटन महोत्सव



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात आज अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा– आराधना दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड पर्यटन महोत्सव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान यांचे मार्फत ३१ डिसेंबर २०२५ व १ जानेवारी २०२६ या दोन दिवशी मुरूड समुद्रकिनारी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.

यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर, माजी नगराध्यक्ष– मंगेश दांडेकर,माजी नगरसेवक मनोज भगत, प्रमोद भायदे, हसमुख जैन, योगेंद्र गोयजी, विश्वास चव्हाण, मृणाल खोत, अशोक विरुकुड, वासंती उमरोटकर, विश्वास चव्हाण ,रुपेश पाटील, आदेश दांडेकर, प्रकाश चव्हाण,अजित कासार, ऋषि पोतदार आदिंसह नवनिर्वाचित नगरसेवक व अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे व उद्धवसेना पक्षांचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी सांगितले की मी प्रथम या नगरपरिषदेचा नगराध्यक्ष म्हणून सुत्र हातात घेतल्यानंतर याठिकाणी स्थानिकांना कसा रोजगार मिळेल व तो कसा वाढेल त्याकरिता प्रथम समुद्रकिनारी पर्यटन महोत्सव सुरू केला होता. या पर्यटन महोत्सवातुन अनेकांना रोजगार व कलाकारांना व्यासपीठ मिळाले आहे.यंदा ३१ डिसेंबर २०२५ व१ जानेवारी २०२६ ही दोन दिवसीय सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान मार्फत अनिकेत तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक महोत्सव संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त पर्यटकांनी सहभागी व्हावे असे आवाहन माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी केले.

यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भायदे यांनी सांगितले की पर्यटन महोत्सव माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी सुरू केले. आणि शहरात पर्यटकांचा ओघ वाढु लागला स्थानिक रोजगार मिळु लागले आहेत. आपल्या शहराचं नाव जगाच्या नकाशावर कसा झळकेल याकरिता पर्यटन महोत्सवा सारखे कार्यक्रम होणे आवश्यक असल्याचे मत प्रमोद भायदे यांनी व्यक्त केले.

माजी नगरसेवक मनोज भगत यांनी सांगितले की सांस्कृतिक महोत्सवात स्थानिक कलाकारांना संधी द्यावी तसेच नववर्षाच्या स्वागतासाठी समुद्राच्या मध्यभागी सालाबादप्रमाणे बोटी मध्ये विद्युत रोषणाई व फटाके वाजवून नववर्षाचे स्वागत करावे या कार्यक्रमाला प्लास्टिक पिशवीला बंदी करावी, असे आवाहन माजी नगरसेवक मनोज भगत यांनी केले.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा – आराधना दांडेकर यांनी सांगितले की पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटन महोत्सव आवश्यक आहे.नगरपरिषदेवर ४ वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ प्रशासक होतं नुकतीच निवडणूक संपन्न होऊन जनतेनी मला भरघोस मतदान करुन मला नगरपरिषदेवर नगराध्यक्षा म्हणून पाठविले आहे मागील पाच वर्ष न झालेला पर्यटन महोत्सव यंदा भव्य असा सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान मार्फत सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. मॅरोथॉन स्पर्धा, घेण्यात येणार आहे.

## शब्दांच्या गावा जावे : शब्दांच्या जिवंत जगाची भावस्पर्शी सफर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक येथील लोकमान्य टिळक मोफत वाचनालय येथे येत्या सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत शब्दांच्या गावा जावे हा अत्यंत साहित्यिक, भावनात्मक व रंजक असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमामुळे खालापूर–चौक परिसरातील वाचक, साहित्यिक आणि कवी यांची मांदियाळी भरविणार आहे.

हा कार्यक्रम प्रसिद्ध निवेदिका दीपाली केळकर सादर करणार असून, त्यांच्या सुसंस्कृत व ओघवत्या निवेदन शैलीमुळे श्रोते थेट शब्दांच्या जिवंत जगात प्रवास करत असल्याचा अनुभव घेतील. शब्द म्हणजे केवळ अक्षरांचा समूह नसून, त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व असते.स्वभाव, स्वप्ने, राग, प्रेम, मिश्कीलपणा हे त्या अत्यंत प्रभावीपणे उलगडून दाखवतात.

कार्यक्रमात साधे शब्द, अवघड शब्द, ग्रामीण–शहरी शब्द, जुन्या मराठीतील शब्द तसेच बोलीभाषेतील शब्द यांचे सुंदर उदाहरणांसह सादरीकरण केले जाणार आहे. आवाजातील चढ–उतार, शब्दांमधील गमती–जमती, विनोद, तसेच शब्द कधी कसे अर्थ बदलतात किंवा हास्य निर्माण करतात–अशा रंजक किस्स्यांमुळे कार्यक्रम हलका–फुलका व मनोरंजक ठरणार आहे.

याचबरोबर जुन्या व नव्या मराठी गाण्यांमधील शब्दांचे सौंदर्य, त्यांचा अर्थ, भाव आणि संदर्भ उलगडत शब्द–संगीताचा सुरेल प्रवास घडवला जाणार आहे.

## कोशिंबळे येथे कुलस्वामिनी शेतकरी बचतगटाचा वर्धापन दिन साजरा

**माणगाव : बातमीदार**

बुधवार दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्या अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र, रोहा यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली व नाबार्ड पुरस्कृत स्थापन करण्यात आलेल्या माणगाव तालुक्यातील कोशिंबळे येथील कुलस्वामी शेतकरी मंडळाचा १५ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात आणि शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुणबी समाजाचे अध्यक्ष महादेव बक्कम होते. तर कृषी विज्ञान केंद्र, रोहा येथील वसिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. मनोज तळाठी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी शेतकरी गटांचे महत्त्व, आधुनिक शेती तंत्रज्ञान, शेतीतील नविन प्रयोग, बाजारपेठेतील संधी तसेच शाश्वत शेती विकासावर सखोल मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी गटशेती व संघटित प्रयत्नातून आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय बक्कम यांनी केले. त्यांनी कुलस्वामी शेतकरी मंडळाच्या १५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत मंडळाने राबवलेल्या विविध कृषी उपक्रमांची माहिती दिली. मंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळालेल्या लाभांचा उल्लेख करत भविष्यात आणखी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.यावेळी मंडळाचे अध्यक्ष मांजरे साहेब यांनी उपस्थित मान्यवरांचे, शेतकरी बांधवांचे व ग्रामस्थांचे मनापासून आभार मानले.

या कार्यक्रमाला मांडवकर, माणगाव तालुक्याचे कृषी अधिकारी रविशंकर कावळे, किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्याचे देशमुख, डॉ. मांजरेकर, माजी सभापती संगीता बक्कम, कृषी विस्तार अधिकारी मारकड, दत्ता बक्कम, पोलीस पाटील पुष्पा बक्कम, बापू बक्कम यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी, ग्रामस्थ व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे कुलस्वामी शेतकरी मंडळाचा वर्धापनदिन हा शेतकरी एकत्रिकरण, मार्गदर्शन आणि प्रेरणादायी ठरला.



# कर्जत तालुका परिसराच्या अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ



**कर्जत : प्रतिनिधी**

श्री ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञान यज्ञ सोहळा समिती कर्जत तालुका परिसराच्या वतीने गेल्या ४८ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ आज करण्यात आला. १ जानेवारी २०२६ पर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात किर्तन प्रवाचनांद्वारे ज्ञानदान होणार असून एक कोटी 'जय जय राम कृष्ण हरी'हा नाम जप करण्याचा संकल्प आहे. दररोज गीता पठण, ज्ञानेश्वरी पारायण, संगीत भजने, प्रवचने, हरी कीर्तने करण्यात येत आहेत.

कर्जत मधील पोलीस ठाण्याच्या माऊली मैदानावर अखंड हरिनाम सप्ताहाचे समितीचे अध्यक्ष नथुराम हरपुडे व दिलीप महाराज राणे यांच्या मार्गदर्शना खाली आयोजन कारण्यात आले आहे. पहाटे पासूनच कर्जत शहरातील विविध धर्मियांच्या मंदिरे व प्रार्थना स्थळांमध्ये जाऊन पूजन करण्यात आले. त्यानंतर मिरवणुकीने संत ज्ञानेश्वर व श्रीकृष्णाची मूर्ती पोलीस ठाण्या जवळील माऊली मैदाना पर्यंत आणण्यात आली. त्यानंतर प्रवेशद्वार पूजन करण्यात आले.

माऊली मैदानातील मंडपात गणेश पूजन श्री. व सौ. रवींद्र लाड यांच्या हस्ते, दीप प्रज्वलन दिलीप महाराज राणे, वासुदेव इंगळे, कृपाराम लोवंसी, तुकाराम बागडे यांच्या हस्ते, कलश पूजन श्री. व सौ. राजेंद्र पाटील, मंडप पूजन श्री. व सौ. रामभाऊ वाघमारे, , संत ज्ञानेश्वर पूजन श्री. व सौ. नथुराम हरपुडे, श्रीकृष्ण पूजन श्री. व सौ. राजेंद्र भोपतराव, सचिन दानवे, विठ्ठल रखुमाई पूजन श्री. व सौ. निरंजन पाबळे, ज्ञानेश्वरी पूजन श्री. व सौ. संभाजी देशमुख, गीता ग्रंथ पूजन श्री. व सौ. मुकेश सुर्वे, टाळ, विणा, पखवाज पूजन श्री. व सौ. अरुण निघोजकर, ध्वजपूजन व ध्वारोहण विजय मांडे, व्यासपीठ पूजन सचिन दानवे, पांडुरंग गरवारे, पारायणाचार्य पूजन शिवाजी भासे, बळवंत घुमरे, सुचिता वांजळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जनार्दन भासे यांनी ज्ञानेश्वर माऊलींसाठी छत्री भेट दिली. त्यानंतर ज्ञानेश्वरी पारायण करण्यात आले. नरेंद्र जोशी यांनी संपूर्ण पौरोहित्य केले. सायंकाळी ह. भ. प. श्रीराम महाराज पुरोहित यांचे प्रवचन झाले.

याप्रसंगी संतोष वैद्य, वनिता म्हसे, साजन ओसवाल, संभाजी देशमुख, जनार्दन भासे, चंद्रकांत म्हसे, सुदाम कारले, अमोल देशमुख, अनिल दगडे, ज्ञानेश्वर बागडे, ओंकार दळवी, चंद्रकांत कदम, माणिक हरपुडे, सिता वाघमारे, मनीषा सुर्वे, कुमुदिनी कार्ले, सुरेखा देशमुख, कोमल देशमुख आदी उपस्थित होते.

सप्ताह भर कार्यक्रम .....

या हरी नाम सप्ताहात दोन दिवस श्रीराम महाराज पुरोहित, त्यानंतर. प्रवीण महाराज फराट, निलेश महाराज महाजन यांची प्रवचने होणार असून योगीराज महाराज गोसावी ( संत एकनाथ महाराजांचे चौदावे वंशज पैठण ), दिलीप महाराज राणे, समाधान महाराज शर्मा, ( बीड ), अनिल महाराज पाटील ( बार्शी ), महंत प्रमोद महाराज जगताप ( बारामती – पुणे ), उमेश महाराज दशरथे ( आळंदी, ) यांची हरी कीर्तने होणार आहेत.

## संत परिषदेच्या उपाध्यक्षपदी सोनावणे

**मोहोपाडा :** आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिनेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संघटन मजबुतीसाठी हभप विक्रम आसाराम सोनावणे महाराज यांना आंतरराष्ट्रीय संत परिषद महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष या पदावर त्यांची घोषणा करण्यात आली.

पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, भारत भूमी ही संतांची आहे संतांचा मान सन्मान ,संतांची सुरक्षा, आज संघटनेचा लक्ष आहे. हिंदू रक्षणासाठी धर्म रक्षणासाठी संघटन नेहमीच हिंदूंच्या पाठीशी ठामपणे उभा असणार आंतरराष्ट्रीय बजरंग दल हे संघटन देशभरामध्ये हिंदूंचे सेवक म्हणून काम करत आहेत.

# बळीराजा फाऊंडेशनच्या कृषी दिनदर्शिकेचे प्रकाशन



**धाटाव : प्रतिनिधी**

नगराध्यक्ष निवडीनंतर हा पहिलाच कार्यक्रम आहे. शेती, निसर्गाशी संबंधीत आहे याचा आनंद वाटला. कार्यक्रमाला हजर राहून स्वतःच्या कृषी ज्ञानात भर पडली. देश शेतीप्रधान आहे. शेतकरी समृद्ध झाला तर आधी गाव मग देश समृद्ध होईल. यातून आम्हालाही मार्गदर्शन मिळत जाईल, शेती, निसर्गाशी एकरूप होण्याचे हे कार्य आहे. शेतीची आवड निर्माण करत तरुणांना दिशा देणारी बळीराजा फाउंडेशन संस्था आहे, कृषी दिनदर्शिका प्रकाशन करताना मनस्वी आनंद होत आहे अशी वैचारिकता रोहा अष्टमी नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी व्यक्त केली.

सलाम रायगड संपादीत बळीराजा फाऊंडेशनच्या कृषी दिनदर्शिका २०२६ प्रकाशन सोहळा कार्यक्रमात शेडगे बोलत होत्या. रोहा येथील शासकीय विश्रामगृह सभागृहात शुक्रवारी आयोजित बळीराजा फाऊंडेशनच्या सेंद्रिय शेती कृषी दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन नवनिर्वाचित नगराध्यक्षा वनश्री शेडगे, तहसीलदार डॉ किशोर देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी कृषी अधिकारी महादेव करे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष नाना खरिवले, सिटी ऑफ फ्लॉवर्सचे सुरेंद्र निंबाळकर, नगरसेवक रोशन चाफेकर, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, सचिव अँड दीपक भगत, रविंद्र कान्हेकर व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक राजेंद्र जाधव यांनी बळीराजा फाऊंडेशनच्या माध्यमातून कालव्याच्या पाण्यासाठी यशस्वी लढा उभा केला, संपूर्ण भाग वाळवंट झाला. शेती ओसाड, विकून टाकत होते हे सर्व थांबवण्यासाठी भागातील तरुण शेतकऱ्यांनी एकत्र येत बळीराजा फाऊंडेशनची स्थापना केली.

# पेण येथील गागोदे बुद्रुक शाळेत भरला आठवडा बाजार

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा गागोदे बुद्रुक येथे नुकतेच शाळेतल्या विद्यार्थ्यांनी आठवडा बाजार भरविला होता. सदर आठवडा बाजाराचे उद्घाटन पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार हा एक स्तुत्य उपक्रम असून खऱ्या अर्थाने मुलांसाठी आनंददायी व प्रेरणादायी असल्याचे सांगून आठवडा बाजार या शैक्षणिक उपक्रमातून मुलांना व्यवहार ज्ञानाबरोबरच भविष्यात उद्योग व्यवसाय करण्यास प्रेरणा मिळत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



यावेळी केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर यांनी आठवडा बाजार याविषयी शैक्षणिक उद्बोधनपर भाषण केले. तर शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली येलवे यांनी या उपक्रमाचा उद्देश कृतीतून व्यवहारज्ञान असल्याचे सांगितले.

या आठवडा बाजारात विद्यार्थ्यांनी पालेभाज्या, फळभाज्या, कापडी पिशव्या, मोड आलेली कडधान्ये, फुले, फळे, वजनकाटा,सौंदर्यप्रसाधने, स्टेशनरी, खेळण्यांची दुकाने, उभारली होती. तर खाद्यपदार्थांमध्ये वडापाव, गुलाबजामुन, आप्पे, उकडलेल्या शेंगा आदी दुकाने उभारली होती. यावेळी उपस्थित मान्यवर, पालक व ग्रामस्थांनी स्वतः ग्राहक बनून या मुलांकडून खरेदी केली.

## डॉ.चिंतामणराव देशमुख वक्तृत्व स्पर्धा २०२६ आयोजन

**रोहा : प्रतिनिधी**

डॉ.चिंतामणराव देशमुख आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा कोएसो डॉ.सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालयाने मंगळवारी २० जानेवारी २०२६ रोजी स. ९.३० वाजता आयोजित केली आहे. या स्पर्धेचे ठिकाण : कोएसो डॉ.सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा हे आहे स्पर्धेचे ३२ वे वर्षं आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील आणि वरिष्ठ महाविद्यालयातील (अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदा, डीएड, बीएड, बी फार्मसी, डी.फार्मसी, आर्किटेक्चर, एमबीए) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होता येईल.

# टीम इंडियाचा मालिकेवर कब्जा

## भारतीय महिला संघाची श्रीलंकेवर पुन्हा मात

**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

शफाली वर्माच्या बॅटमधून आलेल्या सलग दुसऱ्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर भारतीय महिला संघाने श्रीलंकेविरुद्ध विजयी हॅट्ट्रिक नोंदवत पाच सामन्यांच्या मालिकेत ३-० अशा आघाडीसह कब्जा केला आहे.




भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. रेणुका सिंह ठाकूर आणि दीप्तीने सर्वोत्तम गोलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने श्रीलंकेच्या संघाला ७ बाद ११२ धावांवर रोखले. रेणुकाने सर्वाधिक चार, तर दीप्ती शर्माने तीन विकेट्स घेतल्या.

यानंतर ११३ धावांचा पाठलाग करताना शफाली वर्माने पुन्हा एकदा नाबाद अर्धशतकी खेळीसह संघाला एकतर्फी विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. शफालीने ४२ चेंडूंत ११ चौकार आणि तीन षटकारांसह नाबाद ७९ धावांची खेळी केली. तिने खणखणीत चौकार मारत भारतीय संघाला आठ विकेट्स आणि ४० चेंडू राखून विजय निश्चित केला.

तिरुवनंतपुरमच्या मैदानातील सामन्यातील विजयासह भारतीय संघाने पाच सामन्यांची मालिका खिशात घातली. श्रीलंकेविरुद्ध सलग चौथ्यांदा भारतीय संघाने टी -२० मालिका जिंकली आहे. हा विजय भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरसाठीही खास ठरला, कारण ती आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेमधील सर्वात यशस्वी कर्णधार ठरली. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय संघाने ७७वा टी-२० सामना जिंकला आहे. मेग लेनिंगला मागे टाकत हरमप्रीत टी-२०मधील सर्वात यशस्वी कर्णधार ठरली आहे.

**दीप्ती शर्माची विश्वविक्रमाला गवसणी**

आयसीसीच्या टी-२० क्रमवारीत अव्वलस्थानी असलेल्या दीप्ती शर्माने श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात १५० विकेट्सचा टप्पा पार करणारी ती पहिली भारतीय गोलंदाज ठरली. एवढ्यावरच न थांबता तिने ऑस्ट्रेलियन मेगन शुटच्या वर्ल्ड रेकॉर्डचीही बरोबरी साधील आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या महिला गोलंदाजांच्या यादीत ती मेगनसह संयुक्तरित्या अव्वलस्थानी आहे. दोघींनी आतापर्यंत प्रत्येकी १५१ विकेट्स घेतल्या आहेत.





## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धांचे शनिवारी (दि.२७) या दिवशी मोठया उत्साहात आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच क्रीडा गुण, शिस्त आणि संघभावना वृध्दिंगत करणे हा या क्रीडा स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

या क्रीडा स्पर्धेमध्ये धावणे, गोळा फेक, डॉजबॉल, हॉलीबॉल आदी विविध मैदानी खेळांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले क्रीडाकौशल्य सादर केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी खास पाहुणे म्हणून नवी मुंबई अमली पदार्थ विरोधी सेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष जे.बी.एस.पी. संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, तसेच स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, सी.डी.सी. सदस्य दिपक शिंदे, बी.जे.पी. उत्तर मंडळ सेक्रेटरी प्रिया हनुमंते, प्राचार्या निशा नायर आदी उपस्थित होते. हा क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडण्यासाठी प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## मोहोपाडा प्रिआ शाळेत क्रीडा स्पर्धा उत्साहात



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा प्रिआ स्कूलच्या प्रांगणात वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना व सुप्त गुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्या अंगी स्फूर्ती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका व उपमुख्याध्यापिका सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शाळेचे क्रीडा शिक्षक व्यंकटेश थेवर, जस्वीर सिंग, प्राजक्ता शेजवळ, जयेश भाट यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर आनंद, प्रताप, संग्राम ,विजय संघाच्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींनी मशाल हाती घेऊन क्रीडांगणाला प्रदक्षिणा घालून क्रीडा दिनाचा शुभारंभ केला.

या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक खेळामध्ये लिंबू-चमचा, दोरी उड्या, 'शाळेसाठी तयार व्हा', पुस्तक संतुलन, बेडूक उड्या, तसेच ५० व १०० मीटर धावण्याची स्पर्धा, बॉल बॅलन्स ,डंबेल रेस, अशा विविध मजेशीर खेळांचे तसेच सांघिक खेळामध्ये डॉजबॉल, रीले, पासिंग द बॉल ओव्हर द हेड आणि पासिंग द बॉल अंडर द थाय इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली खेळाडूवृत्ती, चपळता व उत्साह दाखवून दिला.

क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी सवयी, शिस्त व संघभावना निर्माण झाली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. क्रीडा दिनामुळे शाळेचे वातावरण आनंदी व उत्साहपूर्ण झाले होते.

## न्यूझीलंडविरुद्ध टीम इंडियाच्या 'ओपनिंग'साठी रस्सीखेच

**नवी दिल्ली** : आगामी आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा आता केवळ पाच-सहा आठवड्यांच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली असून सर्वच संघांची यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. या स्पर्धेपूर्वी भारताचा संघ न्यूझीलंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिकादेखील खेळणार आहे, मात्र आश्चर्य म्हणजे भारतीय संघात अभिषेक शर्माचा सहकारी सलामीवीर संजू सॅमसन असेल की इशान किशन, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे.

भारतीय संघाने वर्ल्डकपच्या तयारीला वेग दिला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत सलामीच्या जागेसाठी सध्या संघात तीन प्रबळ दावेदार आहेत. यात अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन यांचा समावेश आहे.

## आरडीसीएच्या वरिष्ठ गट क्रिकेट स्पर्धा पेणमध्ये रंगणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ गटातील एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना पेण स्पोर्ट्स असोसिएशन विरुद्ध प्रोफेशनल क्रिकेट अकॅडमी खारघर ह्या दोन संघामध्ये ३१ डिसेंबर रोजी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर खेळला जाणार आहे.



उपांत्य फेरीच्या सामन्यात पेण संघानी सोसायटी क्रिकेट अकॅडमी पनवेल संघावर ४१ धावांनी विजय मिळवला आहे, त्यामध्ये पेण संघानी प्रथम फलंदाजी करतांना ३६.३ षटकांमध्ये सर्व गडी गमावत १९४ धावा केल्या.

प्रतिउत्तर देताना सोसायटी क्रिकेट अकॅडमी संघाचा डाव १५३ धावसंख्येवर आटोपला, रवी सोलंकी ३५ सर्वेश कोळी यांनी २० धावा केल्या, पेण संघाकडून ओम कांबळे यांनी ३ अभिषेक खातू, कौस्तुभ म्हात्रे, देवांश तांडेल यांनी प्रत्येकी २ फलंदाजांना बाद करत संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात फ्रोडेशनल क्रिकेट अकॅडमी खारघर संघानी अष्टभुजा इंटरप्राइजेस संघावर ४ गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला आहे. प्रथम फलंदाजी करताना अष्टभुजा इंटरप्राइजेस संघानी ३९ षटकांमध्ये सर्व गडी गमावत २१३ धावसंख्या उभारली त्यामध्ये संतोष गोस्वामी यांनी सर्वाधिक ९३ धावा तर साहिल लहाने यांनी ३० धावा केल्या. प्रतिउत्तर देताना प्रोफेशनल क्रिकेट अकॅडमी संघानी ३१.२ षटकांमध्ये ६ गडी गमावत २१४ धावांचे लक्ष पूर्ण केले त्यामध्ये जयनील नंदा यांनी ८७ श्रेयस कुमार यांनी ३४ धावांचे योगदान संघाला दिले. अष्टभुजा इंटरप्राइजेस संघाकडून प्रथमेश केणी व आशिष माळी यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले.

अंतिम सामना पेण स्पोर्ट्स असोसिएशन विरुद्ध प्रोफेशनल क्रिकेट अकॅडमी खारघर संघांमध्ये रंगणार आहे. दोन्ही संघांना रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक, खजिनदार प्रशांत ओक सह आरडीसीएचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## कर्जतमध्ये जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद रायगड व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग यांच्या मान्यतेने जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा १७ व १९ वर्षातील मुले /मुली यांच्यासाठी अभिनव ज्ञान मंदिर कॉलेज कर्जत येथे जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ही शनिवारी (दि.२१) झाली.



पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडने आयोजित केलेल्या या स्पर्धेला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड, अभिनव ज्ञानमंदिर यांचे मोलाचे सहकार्य झाले. या स्पर्धेत एकूण २० खेळाडू सहभागी झाले होते. ही स्पर्धा १७ व १९ वर्षातील मुला मुलींसाठी घेण्यात आली. या स्पर्धेचे पंच म्हणून आंतरराष्ट्रीय पदक विजेते मास्टर खेळाडू गोपीनाथ पवार (मुंबई), राष्ट्रीय खेळाडू व राज्य पंच सुरेश धुळप (मुंबई) आणि आणि उपनगर मुंबईचे राजेश शिर्के यांनी काम केले. या स्पर्धेचे व्यवस्थापन पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे कार्यकारणी सदस्य संदीप कृष्णा पाटकर यांनी कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल यांच्या सूचनेनुसार केले होते.

स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग, वेटलिफ्टिंग, कुस्ती खेळाडू हनुमंत खरात सर आणि अभिनव कॉलेजचे नवनाथ दाभाडे सर यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन श्री व्ही बी शिंदे (मुख्याध्यापक) यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सदस्य संदीप पाटकर, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू गणेश तोटे, राष्ट्रीय शरीरसौष्ठवपट्टू सुरेश गीद, कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक श्री. मोरे सर उपस्थित होते.

या वेळी पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने नवनाथ दाभाडे सर यांना माधवबाग संस्थेचा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. तसेच गणेश तोटे याला आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त झाल्याबद्दल आयडी क्लब कर्जत चे हनुमंत खरात सर आणि त्यांच्या सहकार्यानी भेटवस्तू देऊन गौरव केला. मान्यवरांचे आभार प्रदर्शन बगडे मॅडम यांनी केले. या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला कॉलेजचे सचिव मणियार सर, हरिश्चंद्र मांडे (उपाध्यक्ष रायगड जिल्हा किसान मोर्चा) हे मान्यवर उपस्थित होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत मुलांच्या १७वर्षा आतील स्पर्धेत राज कडू (ऑर्चिड ग्लोबल स्कूल, कर्जत) हा स्ट्राँग बॉय झाला. तर मुलींमध्ये जिज्ञासा बडेकर (अभिनव ज्ञानमंदिर ज्यु. कॉलेज) ही स्ट्राँग गर्ल झाली. तर १९ वर्षातील मुलांच्या स्पर्धेत हर्षल घरत(अभिनव ज्ञानमंदिर ज्युनि. कॉलेज कर्जत) आणि मुलींमध्ये आचल राजभर (अभिनव ज्ञानमंदिर ज्युनि. कॉलेज कर्जत) विजेती झाली.

**स्पर्धेतील सुवर्णपदक प्राप्त खेळाडू**

१७ वर्षा आतील मुले-५३. कि.व गट १) गुरुप्रीत उमाशंकर प्रसाद (डोंबे विद्यानिकेतन, दहिवली) ५९ कि. वजनी गट १) अनिरुद्ध अमित देशक (शारदा इंग्लिश मीडियम, कर्जत) ८३ कि. वजनी गट १) राज योगेश कडू (ऑर्चिड ग्लोबल स्कूल, कशेळे) ९३ किलो वजनी गट दीक्षांत संदीप गायकवाड (गजानन विद्या. कडाव) १०५ कि. वजनी गट-- १) रोनक रोशन जितेकर (महात्मा फुले, कॉलेज डोंबाळे, पनवेल) १७ वर्षा आतील मुली----४३ किलो वजनी गट १)तनिष्का गणेश बांदल (केईएस इंग्लिश मीडि. कर्जत) ४७ किलो वजनी गट. १)जानवी चंद्रकांत थोरवे (केईएस इंग्लिश मीडि.कर्जत) ५२ किलो वजनी गट तेजश्री मोहन ढोले. (अभिनव ज्ञान मंदिर कर्जत)६३ किलो वजनी गट १) आर्या मनोहर शिंदे (सरस्वती इंग्लिश मीडियम स्कूल कर्जत) ५) ६९ किलो वजनी गट जिज्ञासा महेश बडेकर (अभिनव ज्ञान मंदिर कर्जत) १९ वर्षा आतील मुले ५३ किलो वजनी गट कृष्णा किशोर जाधव (अभिनव ज्ञानमंदिर कॉलेज) २) संकेत महेंद्र मोरे (हुतात्मा हिराजी पाटील कॉलेज, कडाव) ६६ किलो वजनी गट १) हर्षल अशोक घरत (अभिनव ज्ञान मंदिर) ८३ किलो वजनी गट १) खुशाल रवींद्र घारे, (अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत) ९३ किलो वजनी गट १) सार्थक मंगेश राऊत (अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत) १९ वर्षा आतील मुली ४३ किलो वजनी गट १)अचलकुमारी नवीन राजभर(अभिनव ज्ञानविकास,कर्जत) ५७ किलो वजनी गट १) मृदुला किरण शिंदे (अभिनव ज्ञान मंदिर,कर्जत) ६९ किलो वजनी गट १) हेमांगी विनोद ठमके (अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत).

## स्व. अर्चना प्रभाकर राणे टी-२० चषकाची सांगता



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबागमध्ये १८ डिसेंबर २०२५ रोजी सुरू झालेल्या स्व. अर्चना प्रभाकर राणे टी-२० चषकची सांगता २६ डिसेंबर रोजी झाली. या स्पर्धेचे उद्घाटन अभिजित प्रभाकर राणे व जगन्नाथ शंकर पेढवी यांच्या हस्ते झाले. लीग पद्धतीने खेळवल्या गेलेल्या या स्पर्धेमध्ये १२ संघानी सहभाग घेतला होता.

चार ग्रुपमधून ४ संघ हा उपांत्य फेरीमध्ये दाखल झाले होते ज्या मध्ये यजमान अभिजित राणे क्रिकेक क्लब थळेपाडा याने सर्वोच्च कामगिरी करत प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले. तसेच या स्पर्धेमध्ये चांगली कामगिरी करत ड्रीम्स फाउंडेशन अलिबाग या संघाने दुसरा क्रमांक पटकावला. तसेच अभिजित राणे क्रिकेक क्लब थळेपाडा (ब) ने तृतीय व JCA माणुसकी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट वयक्तिक कामगिरी करणारा अभिजित राणे क्रिकेक क्लब थळेपाडा संघाचा निकेश थळे मालिकावीर ठरला ज्याने ६४ धावा आणि ११ विकेट्स पटकावून या पारितोषिकावर आपलं नाव कोरलं. तसेच ११० धावा जमवणारा गउ- माणुसकी संघाचा प्रशांत कुंटे उत्कृष्ट फलंदाज व ड्रीम्स फाउंडेशनचा हितेश पाटील ७ विकेट्स सह उत्कृष्ट गोलंदाज ठरला.

## सामना सुरु होण्यापूर्वी प्रशिक्षकाचे निधन



**ढाका** : बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये जगभरातील अनेक खेळाडू सहभागी होत आहेत. स्पर्धेचा पहिला सामना २७ डिसेंबर रोजी राजशाही वॉरियर्स आणि ढाका कॅपिटल्स यांच्यात खेळला जात आहे. ढाका कॅपिटल्सच्या सामन्यापूर्वी, सहाय्यक प्रशिक्षक महबूब अली झाकी मैदानावर कोसळले. सामन्यापूर्वी झाकी यांना सिल्हेट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममधून ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले, मात्र त्यांचे प्राण वाचवण्यात यश आलं नाही.

ईएसपीएननं दिलेल्या वृत्तानुसार, बांगलादेश प्रीमियर लीग २०२५ च्या पहिल्या सामन्यापूर्वी ढाका कॅपिटल्स संघ सिल्हेट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये सराव करत होता. या दरम्यान, महबूब अली यांनी सामन्याच्या दिवशी संघाच्या तयारीबद्दल चर्चा केली आणि सामन्यापूर्वीच्या सरावात भाग घेतला. मात्र, अंतिम तयारी दरम्यान, ते अचानक मैदानावर कोसळले. त्यांना ताबडतोब वैद्यकीय मदत आणि सीपीआर देण्यात आलं, मात्र, या अनुभवी खेळाडूचा रुग्णालयात मृत्यू झाला.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**Ramsheth Thakur Public School, Ulwe**

CBSE Affilition No. 1131483 School Code: 35472

**Staff Recruitment**

Applications are invited for the following positions for appointment from April 2026

As our institution continues to grow, we are seeking passionate and dedicated educators who are committed to inspiring young minds and contributing to our vision of academic excellence.

| POST & SUBJECT | No. of Position | QUALIFICATIONS & ELIGIBILITY |
|---|---|---|
| • TGT<br>English (1)<br>Hindi (1) | 2 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) is mandatory<br>• Prior teaching experience in a CBSE school is mandatory<br>• CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| • PRT<br>English (2)<br>Hindi (1)<br>Mathematics (1)<br>Social Science (2) | 6 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) is mandatory<br>• Prior teaching experience in a CBSE school is preferred<br>• CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| • Dance Teacher | 1 | • Graduation/PG in relevant subject with minimum 50% marks<br>• B.P.A |
| • Art & Craft Teacher | 1 | • Graduation/PG with minimum 50% marks<br>• ATD/BFA/MFA/Dp. in Fine Art/Painting/ Drawing & Painting |
| • Music Teacher | 1 | • Graduation/PG in the relevant subject with minimum 50% marks<br>• Sangeet Visharad or BA in Music followed by a 2- year Diploma/Certificate in Music |
| • Physical Education Teacher | 1 | • Graduation/PG in the relevant subject with minimum 50% marks;<br>• B.P.Ed./ M.P.Ed. is mandatory |
| • Karate Instructor/ Coach | 1 | • Graduation/PG in the relevant subject with minimum 50% marks:<br>• A certificate or diploma in karate or Dan grade (e.g.. Black Belt) |

❖Candidates must have completed their schooling from an English Medium institution
❖Excellent command over the English language is essential
❖Strong classroom management and effective communication skills are required
❖Candidates must possess working knowledge of computer applications
❖We offer the best salary packages to deserving and committed candidates
*(Refer CHAPTER-IX of CBSE Affiliation Bye-Laws for Minimum Qualifications – TEACHERS)*

**Note:** To apply, interested candidates should submit their resume/cv, a passport-sized photograph and self-attested copies of all relevant documents (Academic credentials). Applications can be sent via post to the **Chairman, JBSP Sanstha, Ramsheth Thakur Public School, Ulwe at Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Navi Mumbai 410206.**

Alternatively, applications may be submitted by email to rtpsulwe@gmail.com
The deadline for all submissions is **Saturday, 10th January, 2026.**

For Additional Information Contact: **7710090800/8956668957**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel